cmyk

अ



दैनिक

# राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com **नवी दिशा... नवे विचार.....** email:rajyaloktantra75@gmail.com

● छत्रपती संभाजीनगर ● पुणे ● अहिल्यानगर ● जालना ● धाराशिव ● लातुर जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक



नवरात्रोत्सवानिमित्त सर्व भाविक-भक्तांना हार्दिक शुभेच्छा !

बीड - महाराष्ट्र | वर्ष-६ | अंक-२०६ | शनिवार दि.१७ ऑक्टोबर २०२६ | RNI No.: MAHMAR/2021/858 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने-६ | किंमत ३ रूपये

## माळ सातवी



सप्तमीचे दिवशीं सप्तश्रृंगगडावरी हो ।
तेथें तं नांदसी भोंवती पष्पें नानापरी हो ।
जाई जुई शेवंती पूजा रेखियली बरवी हो ।
भक्त संकटी पडता
झेलुनी घेसी वरचेवरी हो ।। उदो ।।

## थोडक्यात...

### सीजेपीच्या आंदोलनामागे अब्जाधीश-बृजभूषण सिंह

नवी दिल्लीः मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्यासाठी राजधानी दिल्लीत कॉकरोच जनता पार्टीने पुकारलेल्या आंदोलनाला आता धक्कादायक राजकीय वळण लागले आहे. भाजपचे माजी खासदार आणि ज्येष्ठ नेते बृजभूषण शरण सिंह यांनी या संपूर्ण आंदोलनामागे थेट अमेरिकन अब्जाधीश इलॉन मस्क यांचा हात असल्याचा खळबळजनक दावा केला आहे. हा देशाविरुद्ध रचलेला आंतरराष्ट्रीय कट असून, केंद्र सरकारवर दबाव आणण्यासाठीच अशा प्रकारच्या आंदोलनांना फूस लावली जात असल्याचा गंभीर आरोप त्यांनी केला आहे. माध्यमांशी संवाद साधताना बृजभूषण शरण सिंह म्हणाले, दिल्लीत सुरू असलेले हे आंदोलन सामान्य नसून, ते थेट इलॉन मस्क यांच्या इशाऱ्यावर चालवले जात आहे. मस्क यांना भारतात स्वतःच्या अटींवर व्यवसाय करायचा आहे. मात्र, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकारने त्यांच्या दबावाला बळी न पडता देशाच्या हिताला प्राधान्य दिले आहे.

### बळीराजासाठी अधिकाऱ्यांचा एक दिवसाचा पगार

मुंबईः सध्या राज्यात दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली आहे. शेतकऱ्यांची उभी पिकं करपू लागली आहेत. पिण्याच्या पाण्याचा जनावरांच्या चाऱ्याचा मोठा प्रश्न निर्माण झाला आहे. राज्यात उद्भवलेल्या दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांना मदत म्हणून आता राज्यातील सर्व आयपीएस, आयएएस, अधिकाऱ्यांनी पुढाकार घेतला आहे. सर्व अधिकाऱ्यांचे ऑक्टोबर महिन्यातील एक दिवसाचे वेतन मुख्यमंत्री सहायता निधीमध्ये देणगी म्हणून उपलब्ध करून देण्यात येणार आहे. राज्यातील सर्व आयपीएस, आयएस, अधिकाऱ्यांनी एक मोठा निर्णय घेतला आहे.

### डोंगराळे अत्याचार-हत्या प्रकरणात आरोपीला फाशी

नाशिकः नाशिक जिल्ह्यातील मालेगाव तालुक्यातील डोंगराळे येथील चिमुकलीवरील लैंगिक अत्याचार आणि हत्या प्रकरणात आरोपी विजय खैरनारला फाशीची शिक्षा सुनावण्यात आली आहे. या प्रकरणात मालेगावच्या जलदगती न्यायालयाने आरोपीला दोषी ठरवले होते. या घटनेच्या दहा महिन्यानंतर मालेगावच्या अपर जिल्हा व सत्र न्यायालयाने निकाल दिला आहे. १६ नोव्हेंबर २०२५ रोजी डोंगराळे गावात साडेचार वर्षांच्या चिमुकलीवर लैंगिक अत्याचार आणि हत्या झाल्याची घटना घडली होती. या घटनेनंतर परिसरात तीव्र संताप व्यक्त करण्यात आला. आरोपीला कठोर शिक्षा व्हावी, या मागणीसाठी मालेगावमध्ये बंद आणि निषेध मोर्चेही काढण्यात आले होते.

## बाजारभाव

**कृषि उत्पन्न बाजार समिती,**
बीड, दि.१६ ऑक्टोबर २०२६

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| शेतमाल | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: ४.०० क्विंटल | २,५०० | २,७६६ | २,६७२ |
| ज्वारी/हायब्रिड : ८८.५० क्विंटल | २,७५१ | ६,००० | ४,४१८ |
| मका/लोकल: १.०० क्विंटल | २,३०० | २,३०० | २,३०० |
| तूर : १.०० क्विंटल | १०,००० | १०,००० | १०,००० |
| उडीद : १४.०० क्विंटल | ९,६०० | ९,८५१ | ९,७३७ |
| बाजरी: १.०० क्विंटल | २,७५० | २,७५० | २,७५० |
| मुग: ८.०० क्विंटल | ९,५०० | ९,५०० | ९,५०० |
| सोयाबीन: ११९.५० क्विंटल | ६,८१० | ७,२२४ | ७,०२३ |
| हरभरा: ७.५० क्विंटल | ६,७०० | ७,६०० | ७,१३० |

# कर्जमाफी झाली; नव्या पीककर्जापासून शेतकरी वंचितच!

## १३,२१६ कोटींचे वाटप, तरीही खरिपात दीड लाख शेतकऱ्यांनाच कर्ज; बँकांच्या कारभारावर नाराजी

मुंबई । प्रतिनिधी

**राज्यातील शेतकऱ्यांना पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कर्जमाफी योजनेचा लाभ देताना त्यांना नव्याने पीककर्ज उपलब्ध करून देणे हा महत्त्वाचा उद्देश होता. मात्र, कर्जमाफीच्या अंमलबजावणीची आणि नव्या कर्जवाटपाची आकडेवारी पाहता या उद्देशालाच हरताळ फासला जात असल्याचे चित्र समोर आले आहे. कर्जमाफीचा लाभ मिळाल्यानंतरही नव्या पीककर्जासाठी शेतकऱ्यांना बँकांचे उंबरठे झिजवावे लागत असून, खरिपात सप्टेंबरअखेर केवळ दीड लाख शेतकऱ्यांनाच नवीन कर्ज मिळाल्याची अधिकृत आकडेवारी आहे. त्यामुळे कर्जमाफी होऊनही शेतकऱ्यांची आर्थिक कोंडी कायम असल्याचे दिसत आहे.**




जुलैपासून सुरू झालेल्या या योजनेअंतर्गत आतापर्यंत १५ लाख ८६ हजार शेतकऱ्यांच्या बँक खात्यांत १३ हजार २१६ कोटी रुपयांची कर्जमाफीची रक्कम जमा करण्यात आली आहे. आधीचे कर्ज थकीत असल्यामुळे अनेक शेतकऱ्यांना बँकांकडून नव्याने पीककर्ज मिळण्यात अडचणी येतात. कर्जमाफीमुळे थकबाकीचा प्रश्न दूर झाल्यानंतर संबंधित शेतकऱ्यांना खरिपासाठी आणि आता रब्बी हंगामासाठी नव्याने पीककर्ज मिळणे अपेक्षित होते. मात्र, ▶▶ पान २ वर

### दुष्काळग्रस्त तालुक्यांत मुख्यमंत्री सहाय्यता कक्ष

दरम्यान, राज्यातील दुष्काळग्रस्त ३०४ तालुक्यांमध्ये मुख्यमंत्री सहाय्यता कक्ष उभारण्याची तयारी सुरू आहे. यासाठी प्रत्येक तालुक्यात स्वतंत्र समिती स्थापन करण्यात येणार असून, त्यामध्ये स्थानिक लोकप्रतिनिधी, डॉक्टर आणि सामाजिक कार्यकर्त्यांचा समावेश असेल. दुष्काळामुळे संकटात सापडलेल्या नागरिकांचे शारीरिक आणि मानसिक आरोग्य सांभाळणे, तसेच त्यांना आवश्यक मदत उपलब्ध करून देणे, हे या समित्यांचे प्रमुख काम असेल.

## प्रवाशांना दिलासा एसटीची हंगामी भाडेवाढ रद्द!



मुंबई । प्रतिनिधी

**महाराष्ट्रातील सर्वसामान्यांना दिलासा देणारी बातमी समोर आली आहे. दिवाळीच्या हंगामात एसटी महामंडळाकडून हंगामी भाडेवाढ रद्द करण्यात आली आहे. १५ टक्के हंगामी भाडेवाढ रद्द करण्याचा निर्णय एसटी प्रशासनाने घेतल्याने महाराष्ट्रातील लाखो प्रवाशांना मोठा दिलासा मिळाला आहे. १५ टक्के हंगामी भाडेवाढ करण्याचा प्रस्ताव प्रताप सरनाईकांकडून नामंजूर करण्यात आला आहे. या निर्णयानंतर आता १ ते १५ नोव्हेंबर दरम्यान भाडेवाढ लागू होणार नाही.**

मिळालेल्या माहितीनुसार, महाराष्ट्रातील लाखो प्रवाशांना मोठा दिलासा देत महाराष्ट्र राज्य रस्ते वाहतूक महामंडळाने दिवाळीच्या ▶▶ पान २ वर

## खासगी रुग्णालयांत उपचारांचे दर मराठी-इंग्रजीत लावणे बंधनकारक

### दरपत्रक न लावणाऱ्या रुग्णालयांवर कारवाईचे निर्देश, शासकनाकडून जिआर जारी

मुंबई । प्रतिनिधी

**राज्यभरातील रुग्ण आणि त्यांच्या नातेवाईकांसाठी दिलासादायक निर्णय घेत महाराष्ट्र सरकारने खासगी रुग्णालये, दवाखाने आणि इतर वैद्यकीय आस्थापनांना वैद्यकीय सेवा व सुविधांचे दर मराठी आणि इंग्रजी या दोन्ही भाषांत ठळकपणे प्रदर्शित करणे बंधनकारक केले आहे. रुग्णांच्या असहाय्यतेचा गैरफायदा घेत अवाजवी शुल्क आकारणे आणि उपचारांच्या बिलांवरून निर्माण होणारे वाद रोखणे, हा या निर्णयाचा प्रमुख उद्देश आहे.**

सार्वजनिक आरोग्य विभागाने शुक्रवारी जारी केलेल्या शासन निर्णयानुसार, महाराष्ट्र नर्सिंग होम रजिस्ट्रेशन रूल्स, २०२१ च्या अनुसूची तीनमध्ये नमूद केलेल्या वैद्यकीय सेवा, त्यांचे दर आणि उपलब्ध सुविधांची माहिती रुग्णालयात येणाऱ्या प्रत्येकाला सहज दिसेल अशा ठिकाणी प्रदर्शित करावी लागणार आहे. नियमांचे उल्लंघन करणाऱ्या संस्थांवर प्रशासकीय आणि कायदेशीर कारवाई करण्याचे निर्देशही अधिकाऱ्यांना देण्यात आले आहेत. या निर्णयामुळे राज्यभरातील रुग्णांना उपचार सुरू करण्यापूर्वी संभाव्य खर्चाची माहिती मिळवणे सोपे होणार आहे. मराठी भाषेत दरपत्रक उपलब्ध झाल्याने इंग्रजी समजण्यास अडचण असलेल्या रुग्णांनाही वैद्यकीय सेवा आणि त्यांचे दर समजून घेता येतील. त्यामुळे उपचारांचा खर्च, उपलब्ध सुविधा आणि आर्थिक नियोजन याबाबत अधिक माहितीपूर्ण ▶▶ पान २ वर



## केंद्र सरकारचे नाक दाबण्यासाठी साखर उत्पादन बंद करा-राजू शेट्टी

बारामती । प्रतिनिधी

**केंद्र सरकारने वारंवार एफआरपीत वाढ केली. परंतु साखरची एमएसपी (साखरेची किमान विक्री किंमत) प्रतिक्विंटल ३१०० रुपयांच्या पुढे नेली नाही. त्यामुळे एमएसपी ३१०० ऐवजी ५००० हजार रुपयांपर्यंत वाढवावी आणि इथेनॉल खरेदी दर प्रतिलिटर ७० रुपयांपर्यंत करावा, तरच ऊस उत्पादकांना प्रतिटन ५ हजार रुपयांपर्यंत ऊसाला दर मिळेल. परंतु हे सरकार निर्ढावलेले असून भांडवलदारांच्या बाजूने निर्णय घेत आहे.**

सरकारचे नाक दाबून शेतकऱ्यांच्या बाजूच्या वरील मागण्या मान्य होण्यासाठी आम्ही महाराष्ट्रात आंदोलन सुरू केले आहे. शेतकऱ्यांच्या मागण्या मान्य होण्यासाठी माळेगावसह सर्व साखर कारखाने बंद करावेत, असे आवाहन स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे अध्यक्ष राजू शेट्टी यांनी माळेगावात केले. बारामतीतील माळेगाव सहकारी साखर कारखान्याच्या ऊस ▶▶ पान २ वर

## एमपीएससी पेपरफुटी प्रकरणाच्या चौकशी समीतीवर तुकाराम मुंढे

### ५ सदस्यीय समितीची गठीत, माजी न्यायमूर्ती दिलीप भोसले अध्यक्ष




मुंबई । प्रतिनिधी

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (एमपीएससी) विविध परीक्षांमधील कथित गैरप्रकार, पेपरफुटी आणि उत्तरपत्रिका गळतीच्या तक्रारींची गंभीर दखल राज्य शासनाने घेतली आहे. या संपूर्ण प्रकरणाची निष्पक्ष आणि सखोल चौकशी करण्यासाठी शासनाने पाच सदस्यीय उच्चस्तरीय चौकशी समिती गठीत केली आहे. यामध्ये सद्या चर्चेत असलेले अधिकारी तुकाराम मुंढे यांचा समावेश आहे. राज्याचे मुख्य सचिव राजेश अगरवाल यांनी ▶▶ पान २ वर

### अध्यक्षपदाचा अतिरिक्त कार्यभार सतीश वाघोले यांच्याकडे

आयोगाचे अध्यक्ष विवेक भीमनवार चौकशी पूर्ण होईपर्यंत रजेवर गेले आहेत. आता त्यांच्या अनुपस्थितीत सदस्य सतीश वाघोळे यांचे नाव प्रभारी अध्यक्षपदासाठी प्रस्तावित करण्यात आले आहे. सतीश बबन वाघोळे हे महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे सदस्य आहेत. महाराष्ट्र शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाच्या अधिसूचनेनुसार, सप्टेंबर २०२६ मध्ये त्यांची आयोगाच्या सदस्यपदी नियुक्ती करण्यात आली होती. त्यांनी ७ सप्टेंबर रोजी पद आणि गोपनीयतेची शपथ घेतली होती.



## मराठवाड्यातील १५ हजार न्यायालयीन कर्मचाऱ्यांचे आंदोलन

छ. संभाजीनगर । प्रतिनिधी

**मुंबई उच्च न्यायालयाच्या धर्तीवर इतर न्यायालयातील कर्मचाऱ्यांनाही समान काम समान वेतनाच्या धर्तीवर वेतनश्रेणी लागू करावी या मागणीसाठी न्यायालयीन कर्मचारी संघटनेने शुक्रवारी दि.१६ ऑक्टोबर रोजी काळ्या फिती लाऊन मराठवाड्यातील १५ हजार न्यायालयीन कर्मचाऱ्यांनी काळ्या फिती लावून आंदोलन केले.**

शासनाने मुंबई उच्च न्यायालयातील न्यायालयीन कर्मचाऱ्यांना सुधारित वेतनवाढीचा लाभ दिला आहे. मात्र उच्च न्यायालया व्यतिरिक्त इतर न्यायालयात काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना सुधारित वेतनश्रेणी लागू केली नाही. त्यामुळे ▶▶ पान २ वर

# विरोध जरांगे पाटलांना की दसरा मेळाव्याला ?

## शिवसेना जिल्हाप्रमुखाला उशिरा आलेली जाग जिल्ह्यात चर्चेचा विषय





बीड । प्रतिनिधी

आगामी दसऱ्याच्या पार्श्वभूमीवर श्रीक्षेत्र नारायणगडावर होणाऱ्या दसरा मेळाव्याची तयारी सुरू असतानाच बीड जिल्ह्यातील राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. शिवसेना (शिंदे गट) बीड जिल्हाप्रमुख स्वप्नील गलधर यांनी मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरांगे पाटील यांना अप्रत्यक्ष इशारा देत, 'आमचे नेते एकनाथ शिंदे यांच्याविषयी तोंड आवरून बोला, अन्यथा जशास तसे उत्तर देऊ,' असा आक्रमक पवित्रा घेतला आहे. विशेष म्हणजे नारायणगडावरून नेत्यांविरोधात भाष्य खपवून घेणार नाही, असेही त्यांनी नमूद केल्याने हा अप्रत्यक्षपणे दसरा मेळाव्यालाच विरोध असल्याचा संशय आता व्यक्त केला जात आहे. ज्यावेळी एकनाथ शिंदे यांच्यावर जरांगे पाटील यांनी आरोप केले त्यावेळी गप्प राहिलेले स्वप्नील गलधर आज

### सोशल मीडियावर तीव्र प्रतिक्रिया

स्वप्नील गलधर यांच्या या भूमिकेवर मराठा समाजबांधव आणि नेटकऱ्यांमधून तीव्र संताप व्यक्त होत आहे. तुमचे तुमच्या नेत्यावर प्रेम असणे स्वाभाविक आहे; मात्र त्या नावाखाली नारायणगडावरील दसरा मेळाव्याला आणि मराठा समाजाच्या एकजुटीला सुरुंग लावण्याचा प्रयत्न करू नका, असा थेट सूर सोशल मीडियावर उमटत आहे. आंदोलनात खांद्याला खांदा लावून लढणारे स्थानिक पदाधिकारी निवडणुकीच्या आणि राजकीय समीकरणांच्या पार्श्वभूमीवर अशी भाषा का वापरत आहेत, असा सवाल आता सामान्य नागरिकांमधून विचारला जात आहे. दरम्यान, दसरा मेळावा जसजसा जवळ येत आहे, तसतसा बीडमधील हा राजकीय वाद अधिक चिघळण्याची शक्यता वर्तवली जात आहे.




अचानक जागे कसे काय झाले असाही सवाल व्यक्त केला जात आहे.

कालपर्यंत मराठा आरक्षण आंदोलनात सक्रिय सहभागी असणाऱ्या गलधर यांनी अचानक घेतलेल्या या यू-टर्नमुळे बीडच्या राजकीय आणि सामाजिक वर्तुळात अनेक तर्कवितर्क लढवले जात आहेत. मागील काळात उपोषणादरम्यान मनोज जरांगे पाटील यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि इतर मंत्र्यांवर ▶▶ पान २ वर



## केंद्र सरकारी कर्मचाऱ्यांना ३० दिवसांचा बोनस जाहीर

नवी दिल्ली । वृतसंस्था

**केंद्र सरकारने आर्थिक वर्ष २०२५-२६ साठी पात्र सरकारी कर्मचाऱ्यांना ३० दिवसांच्या वेतनाइतका अ‍ॅड-हॉक बोनस देण्यास मंजुरी दिली आहे. यासंदर्भात खर्च विभागाने १५ ऑक्टोबर रोजी कार्यालयीन आदेश जारी केला आहे. या निर्णयामुळे उत्पादकता-आधारित बोनस योजनेत समाविष्ट नसलेल्या पात्र कर्मचाऱ्यांना आर्थिक लाभ मिळणार आहे.**

या बोनसचा लाभ ग्रुप सी आणि नॉन-गॅझेटेड ग्रुप बी कर्मचाऱ्यांना मिळेल. तसेच केंद्रीय सशस्त्र पोलीस दल आणि सशस्त्र दलातील पात्र कर्मचारीही या योजनेसाठी पात्र असतील. केंद्र सरकारची वेतनरचना लागू असलेल्या ▶▶ पान २ वर

## अग्रलेख

# डिजिटल क्रांतीचा गाजावाजा आणि कागदपत्रांचा विळखा

डिजिटल इंडिया अभियानाची सुरुवात १ जुलै २०१५ रोजी मोठ्या थाटामाटात झाली. प्रशासनात पारदर्शकता आणणे, नागरिकांचा वेळ वाचवणे आणि सरकारी सेवा थेट घराघरांत पोहोचवणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश होता. गेल्या दशकभरात युपीआय, डिजीलॉकर, आणि विविध सरकारी पोर्टल्सच्या माध्यमातून देशात डिजिटल व्यवहारांचे मोठे जाळे निर्माण झाले आहे, यात शंका नाही. परंतु, या डिजिटल क्रांतीनंतरही महाराष्ट्रातील आणि देशातील सामान्य नागरिक, शेतकरी आणि कामगार कागदपत्रांच्या, वारंवार होणाऱ्या केवायसी पडताळणीच्या आणि सरकारी कार्यालयांच्या फेऱ्यांमधून मुक्त झाले आहेत का? हा प्रश्न आजही तितकाच गंभीर आहे.

डिजिटल इंडियाचे मुख्य सूत्र 'एकदाच माहिती जमा करणे' हे असायला हवे होते. परंतु, प्रत्यक्षात प्रत्येक सरकारी योजनेसाठी, बँकेसाठी आणि नोंदणीसाठी नागरिकांना तीच तीच कागदपत्रे पुन्हा जमा करावी लागत आहेत. डिजीलॉकरची स्थापना माहिती तंत्रज्ञान कायद्याअंतर्गत करण्यात आली असून, त्यातील डिजिटल कागदपत्रांना मूळ कागदपत्रांइतकीच कायदेशीर मान्यता आहे. असे असूनही, प्रत्यक्ष व्यवहारात बँका, स्थानिक महसूल कार्यालये आणि सरकारी यंत्रणा भौतिक छायांकित प्रतींचाच आग्रह धरताना दिसतात. रिझर्व्ह बँकेच्या निर्देशानुसार, केंद्रीय केवायसी नोंदणी संस्थेकडे ग्राहकाची माहिती उपलब्ध असल्यास त्याला पुन्हा तीच कागदपत्रे मागू नयेत, असा स्पष्ट नियम आहे. तरीही प्रत्येक बँकेची शाखा आणि प्रत्येक सरकारी विभाग स्वतंत्रपणे केवायसीचा तगादा लावतो. या प्रशासकीय गोंधळाचा सर्वाधिक फटका देशातील बळिराजाला बसत आहे. 'पीएम-किसान सन्मान निधी' योजनेअंतर्गत वर्षाला ६,००० रुपये मिळवण्यासाठी शेतकऱ्यांना ई-केवायसी, भू-नोंदणी आणि आधार-बँक खाते जोडणीची प्रक्रिया अनिवार्य करण्यात आली आहे. सामायिक सेवा केंद्रांवर ई-केवायसीसाठी अधिकृत शुल्क १५ रुपये निश्चित केलेले असताना, अनेक ठिकाणी ५० ते १०० रुपये उकळले जात असल्याच्या तक्रारी समोर येत आहेत. इंटरनेटची अनुपलब्धता, बायोमेट्रिक पडताळणीत बोटांचे ठसे न जुळणे किंवा मोबाईल क्रमांक आधारशी लिंक नसणे, यामुळे शेतकऱ्याला वारंवार तालुक्याच्या ठिकाणी फेऱ्या माराव्या लागतात. २००० रुपयांचा हप्ता मिळवण्यासाठी शेतकऱ्याचा शेतातला कामाचा दिवस तर मोडतोच, शिवाय प्रवासाचा आणि सेवा केंद्रांचा खर्च होऊन खिशाला कात्री लागते.

महाराष्ट्रात नुकत्याच सुरू झालेल्या 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजनेच्या नोंदणीदरम्यानही हीच परिस्थिती पाहायला मिळाली. अर्ज करताना पोर्टल क्रॅश होणे, आधार ओटीपी न येणे आणि उत्पन्नाच्या दाखल्यांसाठी सेतू केंद्रांबाहेर लागलेल्या लांबलचक रांगा यांनी डिजिटल व्यवस्थेतील त्रुटी उघड्या पाडल्या. याशिवाय, केंद्र सरकारने आता 'ग्रीस्टॅक' अंतर्गत शेतकऱ्यांसाठी 'फार्मर आयडी' देण्याची प्रक्रिया सुरू केली आहे. नवीन ओळख क्रमांकामुळे योजनांचा लाभ मिळणे सोपे होईल असा दावा केला जात असला, तर शेतकऱ्यांच्या दृष्टीने ती 'आणखी एक नोंदणी' आणि 'आणखी एक पडताळणी' ठरत आहे.

तंत्रज्ञानाचा वापर हा नागरिकांचा त्रास कमी करण्यासाठी असायला हवा, यंत्रणेची जबाबदारी नागरिकांवर ढकलण्यासाठी नव्हे. डेटा सुरक्षितता आणि गोपनीयतेचे नियम पाळून, जर एका विभागाकडे नागरिकाची पडताळलेली माहिती उपलब्ध असेल, तर दुसऱ्या विभागाने ती आपोआप स्वीकारणारी सुरक्षित अंतर-विभागीय यंत्रणा उभारणे ही काळाची गरज आहे. डिजिटल इंडियाचे यश हे किती पोर्टल सुरू झाली किंवा किती कोटी अर्ज ऑनलाइन आले, यावरून ठरत नाही; तर त्या पोर्टल्समुळे सामान्य नागरिकाचा किती वेळ वाचला, त्याचा किती खर्च वाचला आणि त्याला किती सहजतेने हक्क मिळाला, यावरून ठरते. सरकारने तंत्रज्ञानाचा केवळ गाजावाजा न करता, प्रशासकीय फेऱ्यांचे हे चक्र थांबवून कागदपत्रांच्या विळख्यातून जनतेची खऱ्या अर्थाने मुक्तता करावी.



बीड - मराठवाडा पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकी संदर्भात महायुतीचे उमेदवार आ. सतीशभाऊ चव्हाण यांच्या प्रचारार्थ माजी आ. जयंतभाऊ जाधव हे बीड येथे आले असता त्यांनी समता परिषदेचे प्रदेश सरचिटणीस तथा सिनेट सदस्य अ‍ॅड. सुभाष राऊत यांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट दिली. यावेळी त्यांचा यथोचित सत्कार करण्यात आला. याप्रसंगी अमृत डावकर, रणजीत पाटील आदींची उपस्थिती होती.

## शेतातील नापिकीच्या नैराष्यातून युवा शेतकरी सुरज शिंदे यांची आत्महत्या

बीड । प्रतिनिधी

**जिल्ह्यात यंदा दुष्काळी परिस्थितीमुळे शेतीचे मोठे नुकसान झाले असून, शेतकरी आर्थिक संकटात सापडले आहेत. अशातच बीड तालुक्यातील कपिलधारवाडी येथील सूरज गोवर्धन शिंदे (वय २१) या युवा शेतकऱ्याने शुक्रवारी (दि. १६ ऑक्टोबर) सायंकाळी सहाच्या सुमारास शेतातील झाडाला गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना घडली. या घटनेमुळे कपिलधारवाडी परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.**

मिळालेल्या माहितीनुसार, यंदाच्या दुष्काळामुळे शेतात नापिकी झाल्याने सूरज शिंदे आर्थिक अडचणीत सापडले होते. शेतीतून अपेक्षित उत्पन्न मिळाले नसताना शासनाकडून मिळालेली मदतही तुटपुंजी असल्याची भावना त्यांच्या मनात होती, अशी माहिती समोर येत आहे. त्यातच आईच्या आजारपणावरील उपचारांसाठी खासगी कर्ज झाल्याचीही परिसरात चर्चा आहे. या सर्व परिस्थितीतून निर्माण झालेल्या नैराश्यातून त्यांनी टोकाचे पाऊल उचलल्याचे सांगितले जात आहे. यंदाच्या अपुऱ्या पावसामुळे आणि दुष्काळी परिस्थितीमुळे बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांसमोर पिकांचे नुकसान, उत्पन्नातील घट आणि वाढता आर्थिक ताण अशी अनेक संकटे उभी राहिली आहेत. अशा परिस्थितीत युवा शेतकऱ्याच्या आत्महत्येच्या घटनेने ग्रामीण भागातील शेतकरी कुटुंबांच्या अडचणी पुन्हा ऐरणीवर आल्या आहेत. शेतीत कष्ट करूनही हातात उत्पन्न पडत नसताना कुटुंबाच्या आजारपणाचा खर्च, खासगी कर्ज आणि अपुरी आर्थिक मदत यांचा सामना अनेक शेतकरी कुटुंबांना करावा लागत आहे. सूरज शिंदे यांच्या मृत्यूमुळे त्यांच्या कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला असून, या घटनेने परिसरात शोककळा पसरली आहे.

## महावितरणचे सेवानिवृत्त अधिकारी राधाकिसन सिरसाट यांचे निधन

बीड । प्रतिनिधी

**महावितरणचे सेवानिवृत्त ऑफिस सुपरिटेंडंट, पुरोगामी विचारांचे खंदे समर्थक आणि माजलगाव परिसरातील परिचित व्यक्तिमत्त्व राधाकिसन दाजिबा सिरसाट (वय ७४) यांचे गुरुवारी (दि. १५) रात्री ९.३० वाजण्याच्या सुमारास अल्पशा आजाराने निधन झाले. शुक्रवार रोजी सकाळी दहा वाजण्याच्या सुमारास त्यांच्या पार्थिवावर अंतिम संस्कार करण्यात आले.**



राधाकिसन सिरसाट ऊर्फ नाना हे मूळचे माजलगाव तालुक्यातील किट्टी आडगाव येथील रहिवासी होते. सध्या ते माजलगाव शहरातील चिंचगव्हाण येथे कुटुंबासह स्थायिक होते. शांत, संयमी आणि मनमिळाऊ स्वभावामुळे ते सर्वपरिचित होते. महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि तथागत गौतम बुद्ध यांच्या विचारांचा त्यांच्यावर सखोल प्रभाव होता. या पुरोगामी विचारांचा वारसा जपत त्यांनी सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय योगदान दिले. मागील काही दिवसांपासून ते आजारी होते. उपचार सुरू असतानाच गुरुवारी रात्री त्यांची प्राणज्योत मालवली. त्यांच्या निधनाची बातमी समजताच मित्रपरिवार, नातेवाईक आणि विविध क्षेत्रांतील मान्यवरांनी दुःख व्यक्त केले. शुक्रवारी (दि. १६) सकाळी १० वाजण्याच्या सुमारास माजलगाव येथील स्मशानभूमीत त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी शैक्षणिक, सामाजिक आणि राजकीय क्षेत्रांतील पदाधिकारी, नेते, कार्यकर्ते, तसेच डॉक्टर, अभियंते, वकील, प्राध्यापक आणि शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते. शोकाकुल वातावरणात त्यांना अखेरचा निरोप देण्यात आला. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, दोन मुली, जावई, भाऊ, पुतणे आणि नातवंडे असा मोठा परिवार आहे. त्यांच्या निधनाने पुरोगामी विचारांशी निष्ठा जपणारे, सामाजिक भान असलेले आणि मनमिळाऊ व्यक्तिमत्त्व काळाच्या पडद्याआड गेले आहे. सिरसाट कुटुंबीयांच्या दुःखात मित्रपरिवार व आप्तेष्ट सहभागी असून सर्व स्तरांतून त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात येत आहे.

### अ‍ॅड.चंद्रकांत नवले यांच्या प्रयत्नांना यश

## तांदळा येथे ग्रामपंचायतीअंतर्गत विविध विकासकामांचा शुभारंभ

गेवराई । प्रतिनिधी

**तांदळा, ता. गेवराई, जि. बीड येथे ग्रामपंचायतीअंतर्गत करण्यात येणाऱ्या विविध विकासकामांचा शुभारंभ व भूमिपूजन आज शिवसेनेचे बीड जिल्हाप्रमुख अ‍ॅड. चंद्रकांत नवले यांच्या हस्ते संपन्न झाले.**

नामदार एकनाथ शिंदे, खासदार डॉ. श्रीकांत शिंदे, बीड जिल्ह्याचे संपर्कमंत्री नामदार भरतशेठ गोगावले आणि संपर्कप्रमुख मनोज शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली, तसेच शिवसेनेचे बीड जिल्हाप्रमुख अ‍ॅड. चंद्रकांत नवले यांच्या प्रयत्नांतून ग्रामपंचायतीअंतर्गत विविध विकासकामांना सुरुवात झाली.



यावेळी बोलताना अ‍ॅड. चंद्रकांत नवले म्हणाले की, येणाऱ्या काळात शिवसेनेच्या माध्यमातून गेवराई तालुक्यातील प्रत्येक गावात विकासकामे पोहोचवण्याचा संकल्प आहे. ग्रामपंचायतीच्या माध्यमातून गावातील मूलभूत सुविधा आणि विकासकामांना प्राधान्य देण्यात येईल. तसेच दुष्काळजन्य परिस्थितीत युती सरकारच्या माध्यमातून शक्य तितक्या नागरिकांना मदत मिळवून देण्यासाठी प्रयत्न केले जातील, असेही त्यांनी सांगितले. यावेळी विधानसभा अध्यक्ष नवनाथ गवते, राजेंद्र मोरे स्वप्नील शिंदे भाऊसाहेब गवते, श्रीहरी आखाडे, नरहरी शिरसाट, पप्पू झांडे, जीवन पाटील शेंबडे, गणेश पाटील, गोवर्धन शिरसाट, गणेश शिरसाट, परमेश्वर शिरसाट, नारायण जाधव, सय्यद गायकवाड आणि नारायण शिरसाट यांच्यासह सरपंच, उपसरपंच, सर्व ग्रामपंचायत सदस्य, शिवसेनेचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

## जालन्यात मराठवाड्यासाठी आरोग्यसेवेचा विस्तार; महिको ट्रस्टला ३ हेक्टर जागा

### कर्करोग, हृदयरोगांसह गंभीर आजारांवर उपचार; वैद्यकीय शिक्षणाच्या सुविधांनाही मंजुरी

मुंबई । प्रतिनिधी

**जालना येथील 'महिको रिसर्च फाऊंडेशन ट्रस्ट'च्या नेत्रालयाला लागून असलेल्या ३ हेक्टर शासकीय जमिनीवर आता केवळ डोळ्यांचेच नव्हे, तर इतर अनेक गंभीर आजारांचे उपचार आणि वैद्यकीय शिक्षण उपलब्ध होणार आहे.**

मूळ नेत्रालयाच्या सेवेला कोणताही धक्का न लावता, या जागेवर वाढीव वैद्यकीय व शैक्षणिक सुविधा सुरू करण्यास फडणवीस सरकारने विशेष अटींवर परवानगी दिली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या निर्देशावरून महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी हा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला असून, यामुळे मराठवाड्यातील रुग्णांना मोठा दिलासा मिळणार आहे. आता या ठिकाणी औषधनिर्माणशास्त्र (फार्मसी) सोडून जनरल मेडिसीन, डायलेसिस, हाडांचे आजार (ऑर्थोपेडिक), कान-नाक-घसा बालरोग, हृदयरोग, मेंदूविकार, रक्ताचे आजार आणि कर्करोग यांसारख्या गंभीर आजारांवर उपचाराच्या सुविधा उपलब्ध होतील. यासोबतच नर्सिंग कॉलेज, ऑप्टोमेट्री कॉलेज, ऑपरेशन थिएटर टेक्निशियन आणि अनेस्थेशिया असिस्टंट यांसारखे वैद्यकीय शिक्षण व प्रशिक्षणाचे अभ्यासक्रमही येथे सुरू करता येतील. मात्र, हे सर्व अभ्यासक्रम केवळ संस्थेत प्रत्यक्ष दिल्या जाणाऱ्या वैद्यकीय सेवांशीच संबंधित असणे बंधनकारक असेल. कोणताही नवीन शैक्षणिक कोर्स सुरू करण्यापूर्वी तो रुग्णालयाच्या प्रत्यक्ष सेवेशी जोडलेला आहे की नाही, याची खात्री जालना जिल्हाधिकाऱ्यांकडून करून घ्यावी लागेल. या जागेचा आणि सुविधांचा वापर निव्वळ सार्वजनिक हितासाठी आणि ना-नफा तत्त्वावरच करावा लागेल. रुग्णांना आणि सर्वसामान्यांना सवलतीच्या व अत्यंत परवडणाऱ्या दरात औषधे, गोळ्या, इंजेक्शन्स आणि वैद्यकीय साहित्य मिळावे यासाठी शासनाच्या योजनेनुसार 'जनऔषधी केंद्र' किंवा ना-नफा तत्त्वावरील औषध विक्री केंद्र सुरू करण्याची मुभा देण्यात आली आहे. या संपूर्ण योजनेवर जालना जिल्हाधिकारी आणि छत्रपती संभाजीनगरचे विभागीय आयुक्त लक्ष ठेवणार आहेत. या मंजुरीमुळे जमिनीचे क्षेत्रफळ वाढणार नाही, जमिनीची मालकी बदलणार नाही किंवा जुन्या नियमांमध्ये कोणतीही सूट मिळणार नाही. तसेच अटींचा भंग झाल्यास शासन योग्य ती कायदेशीर कारवाई करू शकते.- ''आरोग्य हीच खरी ईश्वरसेवा आहे. कर्करोग, हृदयविकार यांसारख्या गंभीर आजारांवर उपचारासाठी गोरगरिबांना पैशांअभावी किंवा उपचारासाठी दूरवर भटकंती करावी लागणे अत्यंत वेदनादायी असते. जालन्यातील या प्रकल्पामुळे आता सर्वसामान्य जनतेला त्यांच्याच भागात अत्यंत माफक आणि परवडणाऱ्या दरात अत्याधुनिक वैद्यकीय सेवा मिळतील.

## पान १ वरून...

### कर्जमाफी झाली; नव्या

प्रत्यक्षात बँकांकडून अपेक्षित प्रतिसाद मिळत नसल्याचे चित्र आहे. खरिपाच्या हंगामात ४५ लाख शेतकऱ्यांना ५२ हजार ८५६ कोटी रुपयांचे पीककर्ज वाटप करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले होते. मात्र, सप्टेंबरअखेर केवळ दीड लाख शेतकऱ्यांनाच नवीन कर्ज मिळाल्याचे समोर आले आहे. खासगी बँकांबरोबरच राष्ट्रीयीकृत बँकांकडूनही शेतकऱ्यांना कर्ज देण्याबाबत टाळाटाळ होत असल्याच्या तक्रारी आहेत. त्यामुळे कर्जमाफीच्या माध्यमातून शेतकऱ्यांना दिलासा देण्याचा सरकारचा प्रयत्न आणि प्रत्यक्षात बँकांकडून होणारे कर्जवाटप यामध्ये मोठी तफावत असल्याचे स्पष्ट होत आहे. दरम्यान, राज्य सरकारने कर्जमाफी योजना आखताना सुमारे ३२ लाख शेतकरी लाभार्थी असतील, असा अंदाज व्यक्त केला होता. मात्र, योजनेच्या निकषांमुळे अनेक शेतकरी पात्रतेच्या प्रक्रियेत अडकले आहेत. उपलब्ध आकडेवारीनुसार, २९ लाख ५० हजार शेतकऱ्यांपैकी २४ लाख ६६ हजार शेतकरी योजनेसाठी पात्र ठरले आहेत. त्यापैकी १७ लाख ६५ हजार शेतकरी खातेदारांचे आधार प्रमाणीकरण पूर्ण झाले असून, १५ लाख ८६ हजार शेतकऱ्यांच्या खात्यांत कर्जमाफीची रक्कम जमा झाली आहे. दुसरीकडे, सुमारे दीड लाख शेतकरी कर्जमाफीच्या निकषांत बसलेले नसल्याची माहिती आहे. कर्जमाफीचा लाभ मिळाल्यानंतरही शेतकऱ्यांना नवीन पीककर्ज मिळत नसल्याच्या प्रकाराची राज्य सरकारने गंभीर दखल घेतली आहे. मुख्य सचिव राजेश अग्रवाल आणि सहकार विभागाचे प्रधान सचिव प्रवीण दराडे यांनी गेल्या आठवड्यात राज्यस्तरीय बँकर्स समितीची ऑनलाइन बैठक घेतली. या बैठकीत शेतकऱ्यांना नव्याने कर्ज देण्याबाबत बँकांकडून होत असलेल्या दिरंगाईवर तीव्र नाराजी व्यक्त करण्यात आली. या बैठकीला विविध बँकांचे वरिष्ठ अधिकारी तसेच केंद्रीय अधिकारी उपस्थित होते. कर्जमाफीइतकीच शेतकऱ्यांना नवीन पीककर्जाची गरज असल्याचे मुख्य सचिवांनी बँक अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणून दिले. शेतकऱ्यांना वेळेत कर्ज उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने कार्यवाही करण्याचे निर्देश देतानाच, नव्या कर्जवाटपाचा साप्ताहिक अहवाल सादर करण्याचे आदेशही देण्यात आले आहेत. त्यामुळे आता बँका या निर्देशांची कितपत अंमलबजावणी करतात आणि रब्बी हंगामात शेतकऱ्यांना प्रत्यक्षात किती कर्ज मिळते, याकडे लक्ष लागले आहे.

------------

### खासगी रुग्णालयांत उपचारांचे दर

निर्णय घेण्यास मदत होईल. रुग्णालयांनी दरपत्रक प्रमुख आणि सहज दिसणाऱ्या ठिकाणी लावणे आवश्यक असून, शुल्कात बदल झाल्यास ते तातडीने अद्ययावत करावे लागणार आहे. यामुळे रुग्णांना आकारण्यात येणाऱ्या शुल्काबाबत पारदर्शकता वाढण्यास आणि बिलांमधील अनपेक्षित आकारणीबाबत प्रश्न उपस्थित करण्यास मदत होऊ शकते. अनेकदा उपचार सुरू झाल्यानंतर किंवा रुग्णालयातून डिस्चार्ज घेताना बिलाची रक्कम अपेक्षेपेक्षा जास्त असल्याच्या तक्रारी समोर येतात. अशा परिस्थितीत उपचारांचे दर आणि उपलब्ध सुविधांची माहिती आधीपासून स्पष्टपणे उपलब्ध असल्यास रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांना खर्चाची तुलना करणे आणि बिलाबाबत स्पष्टीकरण मागणे अधिक सोपे होऊ शकते. या निर्णयामुळे आरोग्य सेवांमध्ये पारदर्शकता वाढवण्यास आणि रुग्णांच्या हिताचे संरक्षण करण्यास मदत होण्याची अपेक्षा आहे. मात्र, या नियमांची प्रभावी अंमलबजावणी, दरपत्रकांची नियमित तपासणी आणि उल्लंघन करणाऱ्या संस्थांवरील कारवाई यांवरच या निर्णयाचा प्रत्यक्ष परिणाम अवलंबून असेल.

--------------

### प्रवाशांना दिलासा एसटीची

सणासुदीच्या पार्श्वभूमीवर १५ टक्के हंगामी भाडेवाढीचा प्रस्ताव अधिकृतपणे रद्द केला आहे. परिवहन संस्था कामकाजाचा ताण सांभाळण्यासाठी दिवाळीसारख्या सणासुदीच्या काळात बस भाड्यात तात्पुरती १५ टक्के वाढ लागू करते. १ नोव्हेंबर ते १५ नोव्हेंबर २०२६ या कालावधीत ही भाडेवाढ लागू करण्यासंदर्भात एक प्रस्ताव नुकताच परिवहन मंत्री आणि एमएसआरटीसीचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांना सादर करण्यात आला होता. मात्र सर्वसामान्यांवर आधीच आर्थिक भार आहे. हे लक्षात घेऊन त्याबाबत चिंता व्यक्त करून प्रताप सरनाईकांनी हा प्रस्ताव फेटाळून लावला आहे. दुष्काळग्रस्त शेतकरी, महागाईने त्रस्त कुटुंबे आणि कामगार वर्ग यांच्या संघर्षावर प्रकाश टाकत सरनाईक यांनी कठीण आर्थिक काळात जनतेवर अतिरिक्त आर्थिक भार लादण्यामागील तर्कावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले.

------------------

### मराठवाड्यातील १५ हजार

कर्मचाऱ्यावर हा अन्याय असल्याची भावना व्यक्त करून सर्व जिल्हा न्यायालयीन कर्मचाऱ्यांनाही सुधारित वेतनवाढ लागू करण्यात यावी अशी मागणी करण्यात आली आहे. या मागणीसाठी जिल्हा न्यायालयीन कर्मचाऱ्यांनी आंदोलनाचे हत्यार उपसले आहे. शनिवारी देखील काळ्या फिती लावून कामकाज केले जाणार आहे. या आंदोलनात मराठवाडयातील आठही जिल्ह्यातील सुमारे १५ हजार कर्मचारी सहभागी झाले आहेत. या आंदोलनानंतरही शासनाने मागण्यांकडे दुर्लक्ष केल्यास ५ नोव्हेंबर रोजी सर्व न्यायालयीन कर्मचारी एकदिवसीय सामूहिक रजा आंदोलन करणार आहेत. या शिवाय त्यानंतर आंदोलन आणखी तीव्र करीत ता. १७ नोव्हेंबरपासून राज्यातील सर्व न्यायालयीन कर्मचारी बेमुदत संपावर जाणार असल्याचा इशारा यावेळी देण्यात आला आहे. दरम्यान, त्यानुसार आज हिंगोली न्यायालयातील न्यायालयीन कर्मचारी गट क संघटना, बेलीफ संघटना, लघुलेखक कर्मचारी संघटना, शिपाई गट ड संघटना यांनी काळ्या फिती लावून या आंदोलनात सहभाग नोंदविला आहे. न्यायालयीन कर्मचारी संघटना अध्यक्ष सचिन देशमुख म्हणाले की, समान काम समान वेतन हि आमची मागणी आहे. त्यानुसार हे आंदोलन केले जात आहे. जे काम वरिष्ठ न्यायालयातील कर्मचारी करतात तेच काम जिल्हा व इतर न्यायालयातील कर्मचारी करतात. न्यायालयीन कर्मचा-यांच्या मागण्या रास्त असून शासनाने यावर तात्काळ सकारात्मक निर्णय घेतला पाहिजे.

-----------

### एमपीएससी पेपरफुटी प्रकरणाच्या

यासंदर्भातील अधिकृत अधिसूचना जारी केली असून, अलाहाबाद उच्च न्यायालयाचे माजी न्यायमूर्ती दिलीप भोसले यांच्याकडे या समितीचे अध्यक्षपद सोपवण्यात आले आहे. या समितीत मुंबई उच्च न्यायालयाचे माजी न्यायमूर्ती पी. डी. नाईक, निवृत्त सनदी अधिकारी गणेश पाटील आणि वरिष्ठ पोलीस अधिकारी लक्ष्मी गौतम यांची सदस्य म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. तर आपल्या धडक आणि पारदर्शक कार्यपद्धतीसाठी परिचित असलेले सनदी अधिकारी तुकाराम मुंढे यांची समितीचे 'सदस्य सचिव' म्हणून निवड करण्यात आली आहे. या समितीच्या कार्यकक्षेत अत्यंत कठोर तरतुदींचा समावेश करण्यात आला आहे. चौकशीदरम्यान एमपीएससीच्या अध्यक्षांसह विद्यमान अथवा माजी सदस्यांचा गैरव्यवहारात प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष सहभाग असल्याचे सिद्ध झाल्यास, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद ३१७ अन्वये त्यांना पदावरून दूर करण्याची शिफारस ही समिती राज्यपालांकडे करू शकणार आहे. याशिवाय, गैरप्रकार किंवा उत्तरसूची गळतीत सामील असलेल्या अधिकारी, कर्मचारी व इतर हितधारकांच्या गैरवर्तनाची चौकशी करून जबाबदारी निश्चित केली जाईल. लाखो स्पर्धा परीक्षा विद्यार्थ्यांचे भविष्य अंधारात लोटणाऱ्या गैरप्रकारांचा छडा लावण्यासाठी शासनाने समितीला दोन महिन्यांची मुदत दिली आहे. समितीचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर दोषींवर कायदेशीर कारवाईचा बडगा उगारला जाणार असून, आयोगाच्या पारदर्शकतेवर निर्माण झालेले प्रश्नचिन्ह मिटवण्यासाठी शासन काय पावले उचलणार, याकडे आता राज्यातील लाखो विद्यार्थ्यांचे लक्ष लागले आहे.

----------

### केंद्र सरकारचे नाक दाबण्यासाठी

गळीत हंगामाला सध्या वेग आला आहे. अशातच साखरची एमएसपी वाढ आणि इथेनॉलचा खरेदी दर वाढ होण्याच्या मागणीसाठी माळेगावच्या कार्यस्थळावर आज राजू शेट्टी, जिल्हाध्यक्ष राजेंद्र ढवाण, दिग्विजय कोकरे, सस्ते, सरगर आदींनी आंदोलन केले व त्यांनी कारखाना प्रशासनाला काटा बंद करण्याचे आवाहन केले. यावेळी कारखान्याचे उपाध्यक्ष नितीन शेंडे आदी संचालकांनी आंदोलनस्थळी उपस्थित राहून आंदोलनकर्ते राजू शेट्टी यांच्या भूमिकेला पाटींबा दिला. यावेळी ज्येष्ठ संचालक बाळासाहेब तावरे, तानाजी कोकरे, य़ोगेश जगताप, नितीन सातव, विजय तावरे, शिवराज जाधवराव, चंद्रशेखर जगताप, रतन भोसले, जयपाल देवकाते, कार्यकारी संचालक जितेंद्र रणवरे, कार्य़ालयीन अधिक्षक अनिलकुमार तावरे आदी पदाधिकारी उपस्थित होते.

-----------

### केंद्र सरकारी कर्मचाऱ्यांना

केंद्रशासित प्रदेशांतील कर्मचाऱ्यांनाही या निर्णयाचा लाभ मिळणार आहे. बोनसची गणना करताना दरमहा ७,००० रुपये वेतनाची कमाल मर्यादा निश्चित करण्यात आली आहे. त्यानुसार ३० दिवसांच्या बोनसची रक्कम ६,९०७.८९ रुपये, म्हणजेच जवळपास ६,९०८ रुपये होते. मात्र, कर्मचाऱ्याचे सरासरी मासिक वेतन ७,००० रुपयांपेक्षा कमी असल्यास बोनसची रक्कम त्यानुसार कमी होईल. तसेच संपूर्ण आर्थिक वर्षाची पात्र सेवा नसलेल्या कर्मचाऱ्यांना त्यांच्या सेवाकालाच्या प्रमाणात बोनस दिला जाणार आहे. बोनस मिळण्यासाठी संबंधित कर्मचारी ३१ मार्च २०२६ रोजी सेवेत असणे आणि आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये किमान सहा महिन्यांची सलग सेवा पूर्ण केलेली असणे आवश्यक आहे. सहा महिन्यांपेक्षा अधिक, परंतु १२ महिन्यांपेक्षा कमी सेवा असलेल्या कर्मचाऱ्यांना त्यांनी केलेल्या सेवेच्या कालावधीनुसार बोनस दिला जाईल.

----------

### विरोध जरांगे पाटलांना की

आक्रमक शब्दांत टीका केली होती. जरांगे यांनी शिंदे यांचा एकेरी उल्लेख केल्यानंतर राज्यभरातील शिवसेनेच्या आमदार, मंत्री आणि जिल्हास्तरीय नेत्यांनी तत्काळ जरांगे यांना कडक शब्दांत प्रत्युत्तर दिले होते. मात्र, त्या संपूर्ण गदारोळात बीडचे जिल्हाप्रमुख स्वप्नील गलधर पूर्णपणे शांत होते. त्यावेळी कोणताही आक्षेप न नोंदवणारे गलधर दसरा मेळावा तोंडावर आला असताना अचानक आक्रमक का झाले, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. नारायणगडावर होणाऱ्या दसरा मेळाव्यात मनोज जरांगे पाटील यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. या मेळाव्याच्या अवघ्या काही दिवसांआधी गलधर यांनी माध्यमांसमोर येत थेट इशारा दिला की, मनोज जरांगे पाटील यांनी आमच्या नेत्याविषयी बोलताना मर्यादा पाळाव्यात. जर एकनाथ शिंदे यांच्यावर एकेरी भाषेत टीका केली, तर आम्ही जशास तसे उत्तर देऊ. नारायणगडावर येऊन नेत्यांविषयी बोलणे खपवून घेतले जाणार नाही. या वक्तव्यानंतर, हा केवळ नेत्यांवरील प्रेमाचा भाग नसून, नारायणगडावरील दसरा मेळाव्याची हवा कमी करण्याचा किंवा अप्रत्यक्षपणे या मेळाव्याला विरोध दर्शवण्याचा राजकीय प्रयत्न आहे का, अशी चर्चा रंगू लागली आहे.

-------------

# राज्य लोकतंत्र

नवा दिशा... नव विचार.....

शनिवार दि. १७ ऑक्टोबर २०२६

३


## थोडक्यात

### श्री सिध्देश्वर शैक्षणिक संकुलात नव दांपत्य मेळाव्याचे आयोजन

माजलगाव । प्रतिनिधी

भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेचे अमृतमहोत्सवी वर्षे व श्री सिध्देश्वर शैक्षणिक संकुलाचे हिरक महोत्सवी वर्षानिमित्त येथील श्री सिध्देश्वर शैक्षणिक संकुलात दि.१७ ऑक्टोबर शनिवार रोजी दुपारी ५:०० वाजता नव दांपत्य मेळावा आयोजित करण्यात आला आहे.

भारतीय कुटुंब व्यवस्था पुर्वापार एकमेकांच्या आधारावर, सामंजस्यावर अवलंबून होती. आदर्शवत संस्काराचे केंद्र होते पण पाश्चिमात्यांच्या अंधानुकरणामुळे आपली कुटुंब व्यवस्था विस्कळीत होते की काय अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. या माध्यमातून मुख्य मार्गदर्शक डॉ विवेक वसंतराव काटदरे यांचे मार्गदर्शन लाभणार असून संवाद करण्यासाठी नव दांपत्य मेळावा आयोजित करण्यात आला आहे तरी २०२० नंतर विवाहबद्ध झालेल्या सर्व नवविवाहित दांपत्यांनी या मेळाव्यास उपस्थिती राहावे असे आवाहन भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेचे सर्व केंद्रीय पदाधिकारी तसेच श्री सिध्देश्वर शैक्षणिक संकुलाचे स्थानिक पदाधिकारी, सभासद, सर्व संस्कार केंद्र प्रमुख तसेच माजी विद्यार्थी संघटना यांनीकेले आहे.

### जयभवानी महाविद्यालयात विद्यार्थी समुपदेशन व व्यावसायिक मार्गदर्शन कार्यशाळा उत्साहात

पाटोदा । प्रतिनिधी

जय भवानी शिक्षण प्रसारक मंडळाचे कला व विज्ञान महाविद्यालय, पाटोदा येथील आजिवन शिक्षण व विस्तार सेवा विभाग व लोकप्रशासन विभागाच्या संयुक्त विद्यमाने आयोजित विद्यार्थ्यांसाठी विद्यार्थी समुपदेशन व व्यावसायिक मार्गदर्शन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. या कार्यशाळेचे उद्घाटन उपविभागीय दंडाधिकारी श्रीमती वसीमा शेख यांच्या




हस्ते करण्यात आले. या वेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर येथील आजिवन शिक्षण व विस्तार सेवा विभागाचे संचालक डॉ. आश्विन राजनिकर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सदाशिव सरकटे होते, तर प्राचार्य डॉ. विश्वास कदम यांनी कार्यशाळेला मार्गदर्शन केले. आजच्या स्पर्धात्मक युगात विद्यार्थ्यांसमोर करिअरच्या अनेक संधी उपलब्ध आहेत. मात्र, योग्य क्षेत्राची निवड, स्वतःच्या क्षमता व आवडीची ओळख, कौशल्यविकास आणि रोजगाराच्या संधींची माहिती यांसाठी समुपदेशनाची आवश्यकता असते. विद्यार्थ्यांना शिक्षणानंतर उपलब्ध असलेल्या विविध व्यावसायिक संधींची जाणीव व्हावी, त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण व्हावा आणि भविष्यातील करिअरविषयक निर्णय घेण्यासाठी योग्य दिशा मिळावी, हा या कार्यशाळेचा मुख्य उद्देश होता.

उद्घाटक श्रीमती वसीमा शेख, प्रमुख पाहुणे डॉ. आश्विन राजनिकर आणि प्रमुख मार्गदर्शक श्री शिवाजीराव पंडित कला विज्ञान महाविद्यालय शिवाजीनगर गेवराईचे प्राचार्य विश्वास कदम तर अध्यक्ष प्राचार्य सदाशिव सरकटे होते प्राचार्य कदम यांनी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक व व्यावसायिक प्रगतीसाठी मार्गदर्शनाचे महत्त्व अधोरेखित केले. विद्यार्थ्यांनी आपल्या आवडीनिवडी, क्षमता आणि कौशल्ये ओळखून ध्येय निश्चित करावे, तसेच उपलब्ध संधींचा योग्य उपयोग करून स्वतःचे भविष्य घडवावे, या दृष्टीने कार्यशाळा उपयुक्त ठरली. उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. आजीवन शिक्षण व विस्तार सेवा विभागाच्या समन्वयक व लोकप्रशासन विभाग प्रमुख तथा डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या अधिसभा सदस्या श्रीमती प्रा.डॉ.कल्पना घारगे यांनी प्रास्ताविकातून कार्यशाळेची भूमिका व उद्देश स्पष्ट केला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. अशोक देवगुडे यांनी केले, तर इंग्रजी विभागाचे प्रा. विनोद किर्दक यांनी उपस्थितांचे आभार मानले. विद्यार्थ्यांना करिअरविषयक योग्य दिशा देणारा हा उपक्रम महाविद्यालयाच्या शैक्षणिक व सामाजिक बांधिलकीचा महत्त्वपूर्ण भाग म्हणुन या कार्यशाळेकडे बघितले जाते.

# शेतकरी, पशुधन आणि फळबागांसाठी आ. धस यांचा शासनाकडे पाठपुरावा

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी विधानसभा मतदारसंघातील आष्टी, पाटोदा आणि शिरूर (कासार) तालुक्यांत अपुऱ्या पावसामुळे निर्माण झालेली तीव्र पाणीटंचाई, पशुधनाच्या चारा-पाण्याचा प्रश्न आणि शेतकऱ्यांच्या फळबागांवर ओढवलेले संकट लक्षात घेऊन आमदार सुरेश धस यांनी मुख्यमंत्री मा.ना.श्री. देवेंद्रजी फडणवीस साहेब आणि महसूल मंत्री मा.ना.श्री. चंद्रशेखरजी बावनकुळे साहेब यांच्याकडे विविध मागण्यांची निवेदने सादर केली. दुष्काळी परिस्थितीत शेतकरी, पशुपालक आणि ग्रामीण नागरिकांना दिलासा देण्यासाठी तातडीच्या उपाययोजना करण्याची मागणी त्यांनी केली आहे.

आष्टी विधानसभा मतदारसंघातील अनेक शेतकरी शेतीसोबत दुग्धव्यवसाय करतात. अपुऱ्या पावसामुळे जनावरांसाठी चारा आणि पिण्याचे पाणी उपलब्ध करणे कठीण झाले आहे. त्यामुळे आष्टी, पाटोदा व शिरूर तालुक्यांत मागणीनुसार जनावरांच्या छावण्या सुरू करण्यास परवानगी द्यावी, अशी मागणी आमदार धस यांनी केली आहे. प्रत्येक छावणीत किमान १०० ते कमाल २०० जनावरे ठेवावीत, जनावरांची संख्या अधिक असलेल्या गावांत स्वतंत्र छावण्या मंजूर कराव्यात आणि साथीच्या आजारांचा प्रादुर्भाव टाळण्यासाठी छावण्यांमध्ये किमान ५०० मीटर अंतर ठेवावे, असेही निवेदनात नमूद केले आहे. छावण्यांमध्ये चारा, पिण्याचे पाणी व आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यावर त्यांनी भर दिला आहे.

पाटोदा आणि शिरूर (कासार) तालुक्यांतील १३५ हून अधिक गावांना दरवर्षी पाणीटंचाईचा सामना करावा लागतो. या गावांसाठी कायमस्वरूपी पाणीपुरवठा योजना प्रस्तावित करून टँकरवरील शासकीय



### १४६ कोटींच्या पाणीपुरवठा योजनेसह जनावरांच्या छावण्या, फळबागांसाठी आर्थिक मदत मागणीसाठी मुख्यमंत्री व महसूल मंत्री यांना निवेदन

खर्च कमी करण्याची मागणी करण्यात आली आहे. पैठण ते माळेगाव चकला, माळेगाव चकला ते शिरूर (कासार) आणि शिरूर येथून कुटेवाडीपर्यंत बंदिस्त पाइपलाइनद्वारे पाणी आणण्याचे नियोजन निवेदनात मांडले आहे. कुटेवाडी येथून नैसर्गिक प्रवाहाने पाटोदा येथे पाणी आणून टँकर भरण्याची सुविधा उभारल्यास टंचाईग्रस्त गावांना पाणीपुरवठा करता येईल. या प्रस्तावित योजनेसाठी सुमारे १४६ कोटी रुपये खर्च अपेक्षित असून, याबाबत सर्वेक्षण करून आवश्यक कार्यवाही करण्याची मागणी आमदार धस यांनी केली आहे.

दुसरीकडे, गेल्या १० ते १५ वर्षांपासून जोपासलेल्या डाळिंब, संत्रा, मोसंबी, द्राक्षे, लिंबोणी, जांभूळ आणि ड्रॅगन फ्रूट यांसारख्या फळबागा पाणीटंचाईमुळे धोक्यात आल्या आहेत. या फळबागा वाचवण्यासाठी केंद्र शासनाच्या तइ-ऋ ठ-च् ऋ अर्थात विकसित भारत रोजगार व आजीविका अभियान (ग्रामीण) योजनेअंतर्गत प्रत्येक पात्र फळबाग धारक शेतकऱ्याला ४,७५,५०० रुपयांपर्यंत अर्थसहाय्य उपलब्ध होऊ शकणारा प्रस्ताव केंद्र शासनाकडे पाठवावा, अशी मागणी करण्यात आली आहे. तसेच, केंद्र शासनाच्या कृषी विभागामार्फत फळबागांना प्रतिहेक्टरी १.५० लाख रुपये अर्थसहाय्य मिळावे, यासाठी केंद्रीय कृषिमंत्री मा.ना.श्री. शिवराजसिंहजी चौहान यांच्याकडे प्रस्ताव सादर करण्याची मागणीही मुख्यमंत्री फडणवीस यांच्याकडे करण्यात आली आहे. सन २०१२ मध्ये फळबाग धारकांना प्रतिहेक्टरी ४५ हजार रुपये अर्थसहाय्य मिळाल्याचा संदर्भही निवेदनात देण्यात आला आहे. पशुधनाचे संरक्षण, टंचाईग्रस्त गावांना कायमस्वरूपी पाणीपुरवठा आणि शेतकऱ्यांच्या फळबागा वाचवण्यासाठी शासनाने तातडीने निर्णय घ्यावा, संबंधित विभागांना सर्वेक्षण व प्रस्ताव सादरीकरणाचे निर्देश द्यावेत आणि आवश्यक प्रशासकीय कार्यवाही करावी, अशी मागणी आमदार सुरेश धस यांनी केली आहे. या उपाययोजनांमुळे दुष्काळग्रस्त शेतकरी, पशुपालक आणि ग्रामीण नागरिकांना दिलासा मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# सासु-सुनेच्या नात्यात सामंजस्य असावे-शिवांजली महाराज

पिंपळवंडी । प्रतिनिधी

पाटोदा तालुक्यातील अंमळनेर येथे श्री रेणुकामाता मंदिरात ह.भ.प.महादेवानंद भारती महाराज यांच्या मार्गदर्शनाने महिला अखंड हरिनाम सप्ताह चालू आहे.या सप्ताहात गुरुवार दि.१५ रोजी संध्याकाळी ह.भ.प. शिवांजली महाराज जरांगे यांचे हरिकीर्तन संपन्न झाले.याप्रसंगी शिवांजली महाराज यांनी संत तुकाराम महाराजांच्या अभंगातून भगवतीमाता मानवी कीर्ती वर्णन करताना सांगितले की,महाराष्ट्रात संतांसोबत देवीचे महत्व मोठे आहे.ग्रामीण भागासह शहरात नवरात्र उत्सव उत्साहात साजरा करण्यात येत आहे.आज महिला नवरात्रात रंगीत साड्या घालतात. परंतु,हे नवरंग चुकीचे आहेत. रंगीत साड्या घालण्यापेक्षा देवींच्या वस्त्रांची व शस्त्रांची माहिती मुला- मुलींना दिली पाहिजे. दांडपट्टा चालविणे, तलवारबाजी,कबड्डी खो-खो व शिक्षणासोबत तंत्रकला शिकविल्या पाहिजेत.तरच आपली मुलगी जिजामाता,सावित्रीमाता, घडून व उच्च




पदावर धैर्याने काम करतील.सर्वजण संपत्ती व शेती कमविण्यासाठी धावतात.परंतु, आपली संतती व कुटुंब चांगले होण्यासाठी सत्कार्य केले पाहिजे.महिलांनी देवीचे उपवास करताना सासूला पोटभर जेवण दिले पाहिजे.घरातील अन्नधान्य वस्तूंची माहिती देऊन कार्यशील सुनबाईला सन्मान देऊन मुलीप्रमाणे सांभाळले पाहिजे.तरच देव-देवतांचे वृत्त कामाला येतात.संत ज्ञानेश्वर महाराजांनी देवीला ज्ञानेश्वरी ग्रंथात विश्वमोहिनी म्हटले आहे.संत एकनाथ महाराजांनी आपल्या भारुडातुन देवींचे महात्म्य सांगितले आहे.संतासोबत समाजाने पण महिलांना सन्मान दिला पाहिजे.संत विचारांचे आचरण व विविध पशुंचा सांभाळ म्हणजेच देवीच्या उपवासाचे फलित आहे.पुर्वीच्या काळी अनेक राक्षसांचा उद्रेक झाला होता.या म्हैसासुराचा नाश करण्यासाठी भगवती मातेचा जन्म झाला आणि मातेने महिषासुराचा वध करून पापांचा नाश केला.जमिनीवरील पाप नाहीसे होण्यासाठी व मानवी त्रासापासून मुक्ती मिळण्यासाठी देवी महात्म्य महान आहे.भगवतीमाता सेवे सोबत गोमाता सेवा ही गरजेचे आहे.जीवन जगत असताना देवीचा जागरण गोंधळ घालून अन्नदान महत्त्वाचे आहे.संतांचा जन्म मानवी कल्याणासाठी व अनेकांच्या वाटा उजळण्यासाठी आहे तर देवी आपल्याला भक्ती-शक्तीतून सदैव ऊर्जा देऊन कर्तुत्वाच ज्योत सदैव उजळून मानवाला सुख समृद्धी मिळविण्यासाठी आहे असे सांगितले.आजच्या युवक-युवतींनी सप्ताहात परिश्रम घेऊन संतविचार जपून परमार्थ केला पाहिजे. परमार्थातच आनंद व समाधान आहे.विद्यार्थ्यांनी शिक्षण व परिश्रम घेऊन जीवनात यश मिळवून करिअर घडवावे.आई-वडिलांचे नाव मिळवून आयुष्याचा सुंदर चित्रपट बनवावा असे सांगितले. यावेळी युवा नेते माऊली जरांगे, पंजाब आहेर,भागवत खरमाटे, दादासाहेब पवार, एम.डी.साबळे,बाबासाहेब जाधव, देविदास कापसे,उद्धव रहाटे,राहुल पवार व परिसरातील वारकरी,शेतकरी हजर होते. महिला सप्ताहातील अध्यात्मिक ज्ञानदान अन्नदान कार्यासाठी अंमळनेर येथील शिक्षक,युवक व महिला परिश्रम घेत आहेत.या गांवकऱ्यांचे संत मान्यवर व अधिकाऱ्यांनी कौतुक केले आहे.

## पान ६ वरुन...

पान ६ वरुन...

### २६ गावांसाठी ठिबक उपसा

आवश्यक सूचना दिल्या. तसेच योजनेच्या मंजुरीबाबत सकारात्मक प्रतिसाद देत कार्यवाही करण्याची ग्वाही दिली.माजलगाव धरणाच्या पाणीवाटपाचे फेरनियोजन.जायकवाडी प्रकल्पाच्या सन १९८५ मधील मूळ प्रकल्पीय मंजूर पाणीवापरानुसार माजलगाव धरणासाठी दरवर्षी ५६० दलघमी पाणी उपलब्ध करून देण्यात यावे, तसेच त्यानुसार पाणीवाटपाचे फेरनियोजन करण्यात यावे, अशी मागणी करण्यात आली.

पश्चिमवाहिनी नद्यांचे अतिरिक्त पाणी मराठवाड्यात वळविण्याच्या योजनेचा लाभ

पश्चिमवाहिनी नदीखोऱ्यांतील अतिरिक्त पाणी मराठवाड्यात वळविण्याच्या योजनेस राज्य शासनाने तत्त्वतः मान्यता दिलेली आहे. या योजनेतून उपलब्ध होणाऱ्या अतिरिक्त पाण्याचा प्रभावी विनियोग करण्यासाठी माजलगाव मतदारसंघात नवीन सिंचन प्रकल्प हाती घेण्यात यावेत. तसेच अस्तित्वातील प्रकल्पांची क्षमता वाढवून अतिरिक्त पाणीसाठा निर्माण करण्यासाठी आवश्यक उपाययोजना करण्यात याव्यात, अशी मागणी जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटलांकडे यावेळी आमदार प्रकाश सोळंके यांनी केली आहे.

### गेवराई बसस्थानकात

कबुली दिली असून तिच्याकडून चोरीस गेलेले ६४ हजार रुपये किमतीचे ८ ग्रॅम वजनाचे सोन्याचे मंगळसूत्र पोलिसांनी जप्त केले आहे. या गुन्ह्याचा पुढील तपास पोलीस अंमलदार हरिचंद्र खताळ करत आहेत. सदरची यशस्वी कामगिरी बीडचे पोलीस अधीक्षक नवनीत काँवत, अपर पोलीस अधीक्षक समीर शेख, उपविभागीय पोलीस अधिकारी अनिल कटके यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक किशोर पवार, सहाय्यक पोलीस निरीक्षक समाधान दौड, पोलीस हवालदार गव्हाणे, पोलीस अंमलदार खताळ, ओव्हाळ, पोटे, बागवान आणि महिला पोलीस अंमलदार वडमारे यांच्या पथकाने केली.

### जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन

प्रकल्प राबविला जात आहे. या प्रकल्पांतर्गत बीड जिल्ह्यातील पाटोदा आणि शिरूर कासार या दोन तालुक्यांमधील ग्रामीण भागात टप्प्याटप्प्याने तपासणी शिबिरे आयोजित केली जाणार आहेत. यासाठी दि.३० मार्च २०२७ पर्यंत एकुण १० हजार व्यक्तींच्या कर्करोग तपासणीचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. संकल्प कॅन्सर स्क्रीनिंग प्रकल्पांतर्गत प्रामुख्याने तोंडाचा, स्तनाचा आणि गर्भाशयाच्या मुखाचा कर्करोग या तीन महत्त्वाच्या कर्करोगाच्या तपासणीवर लक्ष केंद्रित करण्यात आले आहे.

ग्रामीण भागात भीती, आर्थिक अडचण किंवा अपुऱ्या माहितीमुळे लोक वेळेवर तपासणी करत नाहीत. हीच बाब लक्षात घेऊन थेट गावपातळीवर आधुनिक उपकरणांसह वैद्यकीय पथक पोहोचविले जाणार आहे. प्राथमिक तपासणीत संशयित रुग्ण आढळल्यास त्यांना पुढील उपचारांसाठी योग्य मार्गदर्शन व पुढील पाठपुरावा करण्यात येणार आहे. आशा स्वयंसेविका, अंगणवाडी सेविका आणि ग्रामपंचायतीच्या मदतीने या मोहिमेबाबत गावात जनजागृती केली जात आहे. मोबाईल मेडिकल युनिटच्या शुभारंभामुळे प्रकल्पाच्या क्षेत्रीय कामकाजाला अधिक बळ मिळणार असून, पाटोदा आणि शिरूर कासार तालुक्यातील नागरिकांपर्यंत कर्करोग तपासणी सेवा पोहोचविण्याच्या प्रयत्नांना गती मिळणार आहे. कर्करोगाविषयी जागरूकता, वेळेवर तपासणी, उपचार आणि योग्य वैद्यकीय मार्गदर्शन यांच्या माध्यमातून ग्रामीण नागरिकांचे आरोग्य जपण्याचा संकल्प या उपक्रमातून पुढे नेण्यात येत आहे. जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी स्वतः मोबाईल व्हॅनमधील सर्व अत्याधुनिक वैद्यकीय यंत्रांची बारकाईने माहिती जाणून घेतली. तसेच रुग्णांची तपासणी कशी केली जाते आणि कोणती वैद्यकीय प्रक्रिया राबविली जाते, याचा थेट आढावा घेतला. या उपक्रमाद्वारे जास्तीत जास्त गरजू रुग्णापर्यंत पोहोचता यावे, यासाठी त्यांनी उपस्थित आरोग्य अधिकाऱ्यांना विविध सूचना केल्या. तसेच कर्करोगाबाबत मोठ्या प्रमाणावर जनजागृती करून संशयित रुग्णांना तातडीने उपचार मिळवून देण्याचे निर्देशही त्यांनी यावेळी दिले.

### महेंद्रवाडी घाट परिसरात

ठिकाणी बांधून ठेवावीत. वनविभागाने या घटनेची तातडीने दखल घेऊन परिसरात गस्त वाढवावी आणि बिबट्यांचा बंदोबस्त करावा, अशी मागणी संतप्त नागरिक व वाहनचालकांकडून केली जात आहे. परिसरातील सर्व नागरिकांनी सुरक्षिततेच्या दृष्टीने काळजी घ्यावी, असे आवाहन याद्वारे करण्यात येत आहे.

# प्राणीमित्र मेजर गणेश खाडे यांचे कौतुकास्पद कार्य



### आळेफाटा येथे अपघातात जखमी बिबट्या उपचारादरम्यान गतप्राण, प्रशासनाला तातडीने माहिती देत खाडेंनी दिले मोलाचे सहकार्य

पाटोदा । प्रतिनिधी

पुणे जिल्ह्यामध्ये वन्यजीव आणि मुक्या प्राण्यांच्या रक्षणासाठी सातत्याने आपले योगदान देणारे बीड जिल्ह्यातील पाटोद्याचे सुपुत्र तथा प्रसिद्ध प्राणीमित्र मेजर गणेश खाडे यांनी पुन्हा एकदा आपल्या सामाजिक जाणिवेचा व तत्परतेचा आदर्श घालून दिला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, प्राणीमित्र मेजर गणेश खाडे हे पुणे-नाशिक महामार्गाने आळेफाटा परिसरातून प्रवास करत होते. यादरम्यान रस्ता पार करताना एका अज्ञात वाहनाच्या धडकेने गंभीर जखमी झालेला बिबट्या रस्त्यावर विव्हळत असल्याचे त्यांच्या निदर्शनास आले.

परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेत, मेजर गणेश खाडे यांनी कुठलाही वेळ न घालवता अत्यंत जबाबदारीने तातडीने वनविभाग व पोलीस प्रशासनाला संपर्क साधून घटनेची सविस्तर माहिती दिली. त्यांच्या या समयसूचकतेमुळे वनविभाग व पोलीस यंत्रणेला त्वरित घटनास्थळी पोहोचणे शक्य झाले आणि मदतकार्य सुरू करण्यात आले. मात्र, दुर्दैवाने अपघातात गंभीर मार लागल्यामुळे उपचारादरम्यान बिबट्या गतप्राण झाला. पाटोदा परिसरासह राज्यभरात गेल्या अनेक वर्षांपासून मेजर गणेश खाडे हे अहोरात्र प्राण्यांची सेवा करत असून, मुक्या प्राण्यांवर संकट ओढावल्यावर धावून जाणारे एक हक्काचे नाव म्हणून त्यांची ओळख आहे. प्रवासात असतानाही दाखवलेल्या या प्रसंगावधानाबद्दल आणि त्यांच्या निस्वार्थ प्राणीसेवेबद्दल सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.

# रब्बी हंगामासाठी उजव्या कालव्याचे पाणी द्या

माजलगाव । प्रतिनिधी

माजलगाव तालुक्यातील दुष्काळी परिस्थिती लक्षात घेता रब्बी हंगामातील पिकांना संजीवनी देण्यासाठी जायकवाडी धरणाच्या उजव्या कालव्यातून पाणी सोडण्यात यावे, अशी मागणी सभापती जयदत्त नरवडे यांनी जलसंपदामंत्र्यांकडे निवेदनाद्वारे केली आहे.

तालुक्यात पावसाचे प्रमाण कमी राहिल्याने शेतकरी अडचणीत सापडले आहेत. खरीप हंगामातील संकटानंतर आता रब्बी हंगामातील पिके घेण्याचे आव्हान शेतकऱ्यांसमोर उभे आहे. पाण्याअभावी पिकांचे नुकसान होण्याची शक्यता असून, त्याचा थेट परिणाम शेतकऱ्यांच्या आर्थिक परिस्थितीवर होऊ शकतो. त्यामुळे जायकवाडी धरणाच्या उजव्या कालव्यातून पाणी सोडल्यास ज्वारी, गहू,



### दुष्काळी परिस्थितीत शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी सभापती जयदत्त नरवडे यांचे जलसंपदा मंत्र्यांना साकडे

हरभरा यांसह अन्य रब्बी पिकांना मोठा आधार मिळणार आहे.

शेतीसाठी पाणी उपलब्ध झाल्यास पिके वाचविण्यास मदत होईल. तसेच जनावरांच्या चाऱ्याचा आणि पिण्याच्या पाण्याचा प्रश्नही काही प्रमाणात सुटण्यास हातभार लागेल. त्यामुळे शेतकऱ्यांची अडचण लक्षात घेऊन जलसंपदा विभागाने तातडीने निर्णय घ्यावा आणि उजव्या कालव्यातून पाणी सोडण्यास मंजुरी द्यावी, अशी आग्रही मागणी सभापती श्री. नरवडे यांनी केली आहे. यावेळी आमदार प्रकाश सोळंके, डॉ. वसीम मनसबदार, संभाजी शेजुळ यांच्यासह अनेकांची उपस्थिती होती.

## जाहीर प्रगटन

मा. श्रीमती. एम. पी. मर्ढेकर, ४ थे दिवाणी न्यायाधीश क. स्तर, बीड ता.जि. बीड यांचे न्यायालयात किरकोळ दिवाणी अर्ज नंबर १४४४/२०२६

पद्मिनबाई दिवे व इतर वि. निरंक

अ‍ॅड.बी.वी. लटपटे यांच्या मार्फत

ज्यापेक्षा दगडु आबाजी दिवे रा. आहेर धानोरा, ता. जि. बीड हे दिनांक २७.०६.२०२ रोजी आहेर धानोरा, ता. जि. बीड येथे मयत झालेले आहेत. आणि तसेच अर्जदार

१ पद्मिनबाई भ्र. दगडु दिवे, वय ७४ वर्षे, धंदा घरकाम, २ सुमनबाई भ्र. दगडु उर्फ दगडोराव दिवे, वय ७७ वर्षे, धंदा-घरकाम, ३ बंडु पि. दगडुराव दिवे, वय ५१ वर्षे, धंदा शेती, ४ मंदाकिनी भ्र. विठठलराव लाखुटे, वय ५७ वर्षे, धंदा घरकाम, ५ अरूणाबाई भ्र. लक्ष्मण इंगोले, वय-५५वर्षे, धंदा घरकाम, ६ उर्मिला भ्र. रघुनाथ इंगोले, वय ५३ वर्षे, धंदा घरकाम, सर्व रा. आहेर धानोरा, ता. जि. बीड.

अर्जदारांची मागणी

बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ च्या कलम २ नुसार वारस प्रमाणपत्र मिळणेबाबत..

असे की, अर्जदार क्र. १ व २ या मयताच्या पत्नी आहेत. अर्जदार क्र. ३ हा मयताचा मुलगा आहे. तसेच अर्जदार क्र. ४ ते ६ या मयताच्या विवाहीत मुली आहेत. अर्जदार क्र. १ ते ६ यांचे व्यतिरिक्त मयतास इतर कोणीही कायदेशिर वारस नाहीत असे वरील अर्जदार यांचे म्हणणे आहे. अर्जदार यांनी मयताचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र त्यांच्या हक्कात मिळण्यासाठी या न्यायालयात त्यांनी हा अर्ज दाखल केला आहे.

त्यापेक्षा सदरहू अर्जदार मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत, त्यांनी हया कोर्टात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्यात, आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट, सदरहू अर्जदारांच्या हक्काबददल लागलीच पुरावा घेऊन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास, त्यांना/अर्जदारांना सदरहू मयत दगडु आबाजी दिवे यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देईल याची नोंद घ्यावी.

प्रकरणाची पुढील तारीख ०२/११/२०२६ आहे.

आज रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्कानिशी दिले.

स्वाक्षरित<br>कनिष्ठ लिपिक<br>दिवाणी न्यायालय क. स्तर, बीड

आदेशावरुन,<br>सहाय्यक अधिक्षक,<br>दिवाणी न्यायालय क. स्तर, बीड

## जाहीर प्रगटन

मा. श्रीमती. एम. पी. मर्डेकर न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, कोर्ट नं.४ बीड यांच्या न्यायालयात. किरकोळ फौजदारी अर्ज ८८५/२०२६

बबन सावंत वि. ग्रामसेवक

अर्जदार बबन पि. किसन सावंत,

वय- ५४ वर्षे, धंदा नोकरी, रा. बोरफडी, ता. जि. बीड.

विरुध्द

गैरअर्जदार जन्म मृत्यु निबंधक तथा ग्रामसेवक, बोरफडी, ता.जि. बीड

मागणी अर्जः- रजिस्ट्रेशन ऑफ बर्थ ॲण्ड डेथ ॲक्ट १९६९ अन्वये जन्माची नोंद घेण्याबाबत..

वरील अर्जदार यांनी या न्यायालयात जन्माची नोंद जन्म मृत्यु निबंधक तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत बोरफडी, ता. जि. बीड. च्या जन्म मृत्यु रजिस्टरला घेण्याबाबत व जन्म प्रमाणपत्र मिळणेबाबत या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

ज्याअर्थी अर्जदार नामे बबन पि. किसन सावंत यांचा जन्म दिनांक २४.०३.१९७२ रोजी बोरफडी, ता. जि. बीड येथे झाला असुन अर्जदार यांना नामे बबन पि. किसन सावंत यांचे जन्म प्रमाणपत्राची शासकीय, निमशासकीय व इतर कार्यालयीन कामकरीता आवश्यकता आहे.

त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार नामे बबन पि. किसन सावंत यांच्या जन्माची नोंद ग्रामपंचायत कार्यालय, बोरफडी, ता. जि. बीड येथील जन्म मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत कोणाची हरकत असेल तर हया जाहिरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत त्यांनी या न्यायालयात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात, आणि हया लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु न्यायालय सदरहु अर्जदार हयांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवुन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु बबन पि. किसन सावंत यांच्या जन्माची नोंद ग्रामपंचायत बोरफडी ता. जि. बीड. येथील जन्म मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत आदेशित केले जाईल, याची नोंद घ्यावी.

दिले आज दिनांक १२ माहे ऑक्टोंबर २०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

स्वाक्षरित<br>कनिष्ठ लिपिक

आदेशावरुन,<br>सहाय्यक अधिक्षक,<br>मुख्य न्यायदंडाधिकारी न्यायालय, बीड.

## जाहीर प्रगटन

मा. श्रीमती एस.आर पाटील न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, कोर्ट नं. २, पाटोदा यांच्या न्यायालयात. किरकोळ फौजदारी अर्ज १७४/२०२६

अण्णसाहेब पि. भगवान निर्मळ वि. ग्रामसेवक

अर्जदार :- अण्णसाहेब पि. भगवान निर्मळ. वय-४९, धंदा-शेती रा. रामवाडी, त. बेनसुर ता. पाटोदा. जि. बीड.

विरुध्द

गैरअर्जदार :-ग्रामपंचायत कार्यालय, बेनसुर ता. पाटोदा, जि. बीड.

मागणी अर्जः- कलम १३(३) (अ) जन्म मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९ प्रमाणे अर्ज.

वरील अर्जदार यांनी या न्यायालयात त्यांची मुलगी तनुजा पि. अण्णासाहेब निर्मळ यांचा जन्माची नोंद ग्रामपंचायत कार्यालय, बेनसुर, ता. पाटोदा, जि. बीड. यांच्या जन्म मृत्यु रजिस्टरला घेण्याबाबत व जन्म प्रमाणपत्र मिळणेबाबत या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

ज्याअर्थी अर्जदार यांची मुलगी नामे तनुजा पि. अण्णासाहेब निर्मळ यांचा जन्म दिनांक २३.०७.२०११ रोजी बेनसुर, ता. पाटोदा, जि. बीड येथे झाला असुन अर्जदार यांना त्यांच्या जन्म प्रमाणपत्राची शासकीय, निमशासकीय व इतर कार्यालयीन कामकरीता आवश्यकता आहे.

त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार यांच्या मुलीची जन्माची नोंद ग्रामपंचायत कार्यालय, बेनसुर ता. पाटोदा, जि. बीड येथील जन्म मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन जन्म प्रमाणपत्र देण्यास कोणाची हरकत असेल तर हया जाहिरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत त्यांनी या न्यायालयात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात, आणि हया लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरह मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु न्यायालय सदरहु अर्जदार हयांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवुन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना त्यांच्या जन्माची नोंद ग्रामपंचायत कार्यालय, बेनसुर, ता. पाटोदा, जि. बीड येथील जन्म मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत आदेशित केले जाईल, याची नोंद घ्यावी.

आज दिनांक १६.१०.२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले. सदर प्रकरणाची पुढील तारीख २७.११.२०२६ आहे.

स्वाक्षरित/-<br>क. लिपीक

स्वाक्षरित/-<br>आदेशावरुन.<br>सहाय्यक अधिक्षक फौजदारी<br>न्यायालय, पाटोदा

# जिल्हा रुग्णालयात नवरात्र महोत्सवात नवदुर्गाचा होणार सन्मान

बीड । प्रतिनिधी

नवरात्र उत्सवाच्या काळात जिल्हा रुग्णालयात जन्मणाऱ्या मुलींचा बेबी कीट व त्यांना जन्म देणाऱ्या मातांचा साडी-चोळी देऊन सत्कार करण्याचा संकल्प जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. सतीशकुमार मधुकरराव सोळंके यांनी केला आहे.

जिल्ह्यात मुलींचा जन्मदर कमी असुन आजही काही लोक गर्भलिंग तपासणी करत आहेत. मुलगी असल्याचे समजताच तिची गर्भातच हत्या केली जात आहे. हाच धागा पकडून लोकांमध्ये जनजागृती व्हावी, समाजात चांगला संदेश जावा व त्यातूनच लेक वाचवा हा संदेश देखील दिला जाणार आहे. जिल्हा रुग्णालयात जन्म होणाऱ्या या दुर्गामुळे स्त्री-पुरुष लिंग गुणोत्तराचे संतुलन सुधारण्यास मदत मिळेल, अशी आशा व्यक्त होत आहे. हा उपक्रम जिल्हा रुग्णालय, बीड व केंद्रीय महिला व बाल विकास मंत्रालयाद्वारे बेटी बचाव बेटी पढाव या उप्रक्रमांतर्गत साजरा करण्यात येणार आहे. असे प्रसिध्दीपत्रकाद्वारे कळविले आहे.

# दुष्काळ निवारणात हलगर्जीपणा केल्यास निलंबनाची कारवाई!

## जिल्हाधिकाऱ्यांना महसूलमंत्र्यांचे अधिकार; लेखी परवानगीशिवाय मुख्यालय सोडण्यास मनाई

मुंबई : प्रतिनिधी

राज्यातील दुष्काळग्रस्त भागांमध्ये दुष्काळ निवारणाच्या उपाययोजनांमध्ये हलगर्जीपणा करणाऱ्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांवर आता निलंबनासह प्रशासकीय कारवाईचा बडगा उगारला जाणार आहे. दुष्काळ निवारणाच्या कामात जाणीवपूर्वक कसूर, शासनाच्या निर्देशांचे उल्लंघन किंवा कामकाजात अनावश्यक विलंब केल्याचे आढळल्यास संबंधितांवर कठोर कारवाई करण्याचे निर्देश महसूल विभागाने दिले आहेत. तसेच, दुष्काळग्रस्त तालुक्यांतील संबंधित अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना सक्षम प्राधिकाऱ्याच्या लेखी पूर्वपरवानगीशिवाय मुख्यालय सोडता येणार नाही. यासंदर्भात महसूल विभागाने शासन परिपत्रक जारी केले आहे.



राज्यात जून ते ऑक्टोबर या कालावधीत कमी पाऊस आणि अन्य प्रतिकूल घटकांमुळे अनेक तालुक्यांमध्ये दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली आहे. या पार्श्वभूमीवर शासनाकडून विविध सवलती आणि दुष्काळ निवारणाच्या उपाययोजना लागू करण्यात आल्या आहेत. मात्र, या उपाययोजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी प्रशासनातील अधिकारी व कर्मचाऱ्यांची प्रत्यक्ष उपस्थिती आणि जबाबदारी निश्चित करण्यावर महसूल विभागाने भर दिला आहे. महसूल विभागाच्या अखत्यारितील नायब तहसीलदार संवर्गापर्यंतच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या बाबतीत दुष्काळ आणि टंचाई निवारणाच्या कामात कर्तव्यात जाणीवपूर्वक कसूर, हलगर्जीपणा, शासनाच्या निर्देशांचे उल्लंघन अथवा कामकाजात अनावश्यक विलंब झाल्याचे निदर्शनास आल्यास प्रशासकीय कार्यवाही आणि निलंबन करण्याचे महसूलमंत्र्यांचे अधिकार संबंधित जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आले आहेत. तसेच, तहसीलदार, उपजिल्हाधिकारी, प्रांत अधिकारी, उपअधीक्षक भूमी अभिलेख, नोंदणी उपमहानिरीक्षक आणि मुद्रांक उपनियंत्रक या संवर्गातील अधिकाऱ्यांविरुद्ध कारवाई करण्याचे अधिकार संबंधित विभागीय आयुक्तांना प्रत्यार्पित करण्यात आले आहेत. त्यामुळे दुष्काळ निवारणाच्या कामात जबाबदारी टाळणाऱ्या अधिकारी-कर्मचाऱ्यांवर प्रशासकीय स्तरावर तातडीने कारवाई करण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. दुष्काळग्रस्त तालुक्यांमध्ये पीक पंचनामे तातडीने पूर्ण करणे, पीक परिस्थितीचे छायाचित्र आणि जीपीएस निर्देशांक संकलित करून अहवाल सादर करणे, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत जास्तीत जास्त कामे सुरू करणे, तसेच आवश्यकतेनुसार टँकरद्वारे पाणीपुरवठा करणे, या कामांना प्राधान्य देण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. याशिवाय, पाणीपुरवठा खंडित होऊ नये यासाठी आवश्यक उपाययोजना करणे, अन्नधान्याची उपलब्धता सुनिश्चित करणे, पशुधनासाठी चारा उपलब्ध करून देणे, जलसंधारणाची कामे सुरू करणे आणि पिण्याच्या पाण्यासह जनावरांच्या पाण्याचे योग्य नियोजन करणे आवश्यक आहे. संबंधित अधिकाऱ्यांनी नियमित क्षेत्रभेटी घेऊन प्रत्यक्ष परिस्थितीची पाहणी करावी, या भेटींची नोंद ठेवावी आणि स्थानिक गरजेनुसार तातडीच्या उपाययोजना प्रस्तावित करून त्यांची अंमलबजावणी सुनिश्चित करावी, असेही परिपत्रकात स्पष्ट करण्यात आले आहे. दुष्काळाच्या काळात पाणीपुरवठा, टँकर, चारा, रोजगार हमीची कामे, पीक पंचनामे आणि शासकीय सवलतींच्या अंमलबजावणीत होणारा विलंब शेतकरी, सर्वसामान्य नागरिक आणि पशुधनासाठी गंभीर ठरू शकतो. त्यामुळे प्रत्येक तालुक्यातील दुष्काळी परिस्थितीचे सूक्ष्म नियोजन करून शासनाच्या उपाययोजना वेळेत राबविणे आवश्यक असल्याचे महसूल विभागाने अधोरेखित केले आहे. दुष्काळ निवारणाच्या कामांवर अधिकाऱ्यांची जबाबदारी निश्चित करताना मुख्यालयातील उपस्थिती, नियमित क्षेत्रभेटी आणि कामांच्या अंमलबजावणीवर देखरेख ठेवण्यावर भर देण्यात आला आहे. शासनाच्या निर्देशांकडे दुर्लक्ष करणाऱ्या किंवा मदतकार्यात हलगर्जीपणा करणाऱ्या संबंधित अधिकारी-कर्मचाऱ्यांना कारवाईला सामोरे जावे लागणार असल्याने दुष्काळ निवारणाच्या कामांना आता अधिक गती मिळण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१८६७ : सोविएत रशियाला ७२ लाख डॉलर देऊन अमेरिकेने अलास्का हा प्रांत खरेदी करुन ताब्यात घेतला.
१८७९ : थिऑसॉफिकल सोसायटीची स्थापना
१९०६ : महर्षि विठ्ठल रामजी शिंदे यांनी 'डिप्रेस्ड क्लास मिशन'ची स्थापना केली.
१९१९ : राम गणेश गडकरी लिखित 'संगीत भावबंधन' या नाटकाचा पहिला प्रयोग दीनानाथ मंगेशकरांच्या 'बळवंत संगीत नाटक मंडळी'ने केला.
१९२२ : ब्रिटिश ब्रॉडकास्टिंग कार्पोरेशनची स्थापना
१९६७ : सोविएत रशियाचे 'व्हेनेरा-४' हे अंतराळयान शुक्रावर उतरले.
१९७२ : प्रथम बहुउद्देशीय हेलिकॉप्टर एस. ए. ३१५ ची चाचणी बैंगलोर येथे घेण्यात आली.
१९७७ : २०६०-चिरॉन हा अंतरिक्षातील सर्वात दूरवरील लघुग्रह शोधण्यात आला.
२००२ : कसोटी व एकदिवसीय क्रिकेट सामन्यात वीस हजार धावा करणारा सचिन तेंडुलकर पहिला क्रिकेटपटू ठरला.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८०४ : मोंगकुट ऊर्फ राम (चौथा) थायलंडचा राजा (मृत्यू: १ आक्टोबर १८६८)
१८६१ : 'भारताचार्य' चिंतामणराव वैद्य न्यायाधीश, कायदेपंडित, लेखक, आणि इंग्रजी व संस्कृतचे जाणकार. महाभारताच्या मराठी भाषांतराचा समारोप म्हणून त्यांनी लिहिलेल्या 'महाभारताचा उपसंहार' या ग्रंथामुळे लोकमान्यांनी त्यांना 'भारताचार्य' ही पदवी दिली. (मृत्यू: २० एप्रिल १९३८)
१९२५ : संगीत नाटक अकादमी पुरस्कार तसचं, पद्मभूषण व पद्मविभूषण पुरस्कार सन्मानित प्रख्यात भारतीय भारतीय नाट्य दिग्दर्शक आणि नाट्य शिक्षक तसचं, नॅशनल स्कूल ऑफ ड्रामाचे संचालक इब्राहीम अलकाजी यांचा जन्मदिन.
१९२५ : इब्राहिम अल्काझी नॅशनल स्कूल ऑफ ड्रामाचे संचालक
१९३९ : ली हार्वे ओस्वाल्ड राष्ट्राध्यक्ष जॉन एफ. केनेडीचा मारेकरी (मृत्यू: २४ नोव्हेंबर १९६३)
१९५० : ओम पुरी अभिनेता
१९५६ : मार्टिना नवरातिलोव्हा झेकोस्लोव्हाकियाची लॉन टेनिस खेळाडू
१९६५ : इस्लामिक रिसर्च फाउंडेशन (आयआरएफ) चे संस्थापक आणि अध्यक्ष झाकीर नाईक यांचा जन्म.
१९७४ : भारतीय लेखक अमिश त्रिपाठी यांचा जन्म.
१९७७ : भारतीय अभिनेता कुणाल कपूर यांचा जन्म.
१९८४ : भारतीय अभिनेत्री फ्रीडा पिंटो यांचा जन्म.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१८७१ : चार्ल्स बॅबेज इंग्लिश गणितज्ञ, संशोधक, अभियंता आणि तत्त्वज्ञ, पहिल्या यांत्रिकी संगणकाचा जनक (जन्म: २६ डिसेंबर १७९१)
१९०९ : लालमोहन घोष देशभक्त, काँग्रेसचे १६ वे अध्यक्ष, भारताच्या विविध राजकीय हक्कांकरिता त्यांनी इंग्लंडमधील ब्रिटिश जनतेत प्रचार केला. (जन्म: १७ डिसेंबर १८४९ कलकत्ता)
१९३१ : थॉमस अल्वा एडिसन अमेरिकन संशोधक आणि उद्योजक (जन्म: ११ फेब्रुवारी १८४७)
१९५१ : हिराबाई पेडणेकर पहिल्या स्त्री नाटककार, गायिका, संगीतकार (जन्म: २२ नोव्हेंबर १८८५)
१९७६ : भारतीय कवी आणि लेखक विश्वनाथ सत्यनारायण यांचे निधन. (जन्म: १० सप्टेंबर १८९५)
१९८३ : विजय मांजरेकर क्रिकेटपटू (जन्म: २६ सप्टेंबर १९३१)
१९८७ : वसंतराव तुळपुळे कम्युनिस्ट कार्यकर्ते. कार्ल मार्क्सच्या 'दास कापिटाल' या ग्रंथाचा त्यांनी मराठीत अनुवाद केला होता. (जन्म:)
१९९३ : मंदाकिनी विश्वनाथ आठवले भारतीय चित्रपटसृष्टीतील पहिल्या बालअभिनेत्री. दादासाहेब फाळके यांच्या त्या कन्या होत. त्यांनी फाळके यांच्या 'कालियामर्दन' या मूकपटात काम केले होते. (जन्म:)
१९९५ : ई. महमद छायालेखक (शेजारी, दहा वाजता, आसमान, चोरीचा मामला) (जन्म:)
१९९६ : भारतातील प्रमुख क्रांतिकारक रामकृष्ण खात्री यांचे निधन.
२००४ : भारतातील कुख्यात चंदनवादी तस्करी व नक्षलवादी वीरप्पन यांना ठार मारण्यात आले.
२००४ : वीरप्पन चंदन तस्कर (जन्म: १८ जानेवारी १९५२)

# उष्णतेत पालेभाज्यांची अशी घ्या काळजी
## भाजीपाला संशोधन केंद्रांने दिला सल्ला

यंदा ऑक्टोबर हीट प्रचंड असल्याने त्याचा पालेभाजा पिकांवर ताण येत आहे. त्याचा फटका शेतकऱ्यांच्या खिशाला बसतो. त्यामुळे शेतकऱ्यांनी वेळीच लक्षणे तपासून पिकांची योग्य काळजी घेणे गरजेचे आहे. यात वारंवार पाणी, सावलीची सोय, शेडनेट, खत आणि पिकाच्या पोषणाचे व्यवस्थापन करण्यावर शेतकऱ्यांनी भर देण्याचे आवाहन भाजीपाला संशोधन केंद्रांनी केले आहे.



पालेभाज्या कमी कालावधीत येत असल्या तरी त्यांना नियमित सिंचनाची आवश्यकता असते. तसेच त्यांना कायमस्वरूपी बाजारात मागणी असल्यामुळे वेळीच उपाय करुन पीक वाचवणे शेतकऱ्यांच्या फायद्याचे ठरते. पालेभाज्यांवर उष्णतेचा ताण आल्यावर पाने दुपारच्या वेळी माना टाकतात. तर ताणाची तीव्रता वाढल्यावर पाने करपून जातात. दुष्काळात जमिनीचे तापमान वाढते त्यामुळे पिकांची मुळं सुकतात आणि वाढ खुंटते. जास्त तापमानामुळे पालेभाज्यांच्या पानांचा रंग बदलतो, त्यांचा पोत खराब होतो आणि मुख्य म्हणजे पौष्टिकता कमी होते. त्यामुळे पिकांची वेळीच काळजी घेणे अत्यंत गरजेचे असते. वातावरणातील उष्णता वाढल्यावर पिकांना हळूहळू आणि गरजेनुसार, हलके वारंवार पाणी द्यावे. पाणी देताना ते सकाळी लवकर किंवा सायंकाळी उशिरा द्यावे. जेणेकरुन बाष्पीभवन कमी होईल. भाजीपाला उष्णतेपासून वाचवण्यासाठी पिकांवर ५० ते ७० टक्के सूर्यप्रकाश रोखणारे शेडनेट किंवा हिरव्या जाळ्या लावाव्यात. दुपारी उन्हाचा तडाखा वाढत असल्याने संध्याकाळी त्यावर पाण्याचा हलकाच फवारा मारावा. तसेच त्याने पानांचे तापमान कमी होते आणि ती ताजी राहतात. दुष्काळाच्या परिस्थितीत पिकांना नेहमी सेंद्रिय खतांचा पुरवठा जास्त करावा. त्यामुळे जमिनीत शेणखत, गांडूळखत मिसळावे. त्यामुळे जमिनीची पाणी धरुन ठेवण्यची क्षमता वाढते. पालेभाज्यांचा उन्हाचा ताण सहन करण्याची क्षमता वाढण्यासाठी पोटॅशिअम आणि अमिनो नायट्रेट खतांची फवारणी करावी. परंतु खते देताना ती कडक उन्हात न देता सकाळी किंवा संध्याकाळी द्यावीत. त्यामुळे पिकांची मुळे जळत नाहीत. पालेभाज्यांचा कालावधी फार कमी असल्यामुळे त्यांची काढणी ही सकाळी किंवा संध्याकाळी उशीरा करावी. यामुळे पालेभाजा कोमेजत नाहीत. तसेच काढणीनंतर पालेभाज्या थंड वातावरणात ठेवाव्यात. अशा प्रकारे योग्य वेळी वारंवार पाणी, सावली, सेंद्रिय खत यांच्या मदतीने शेतकरी पालेभाज्यांची काळजी घेऊ शकतात.

# मोसंबीचे कीड, रोग व्यवस्थापन कसे करावे

मागील काही महिन्यांपासून शेतकरी सातत्याने संकटात सापडत आहे. या संकटातून कोणताच शेतकरी वाचताना दिसत नाही. तसेच फळबाग उत्पादक शेतकरी देखील अडचणीत येताना दिसत आहेत. मोसंबी उत्पादक शेतकरी देखील अडचणीत सापडले आहेत. मोसंबीवर सातत्याने मावा, सिल्ला, पाने खाणारी अळी, ढेकूण, डिंक्या अशा रोगांमुळे शेतकरी अडचणीत येतात. फळगळ देखील सातत्याने होत असते. यामुळे आंतरमशागतीची कामे वेळेवर करून तणनियंत्रण करावे. किडींचा प्रादुर्भाव लक्षात घेता सापळे लावावेत, असा सल्ला कृषी अभ्यासक देतात.

किड आणि रोग व्यवस्थापन : मावा किडीच्या नियंत्रणासाठी डायमिथोएट २० मिलीलीटर दहा लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. तसेच पाने खाणाऱ्या अळीला रोखण्यासाठी क्विनॉलफॉस २० मिलीलीटर १० लिटर पाण्यात मिसळून फवारावे. ढेकूणच्या नियंत्रणासाठी क्लोरोपायरीफॉस २५ मिलीलीटर किंवा डायमेथोएट २० मिलीलीटर १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.

आंबिया बहारसाठी खताचे नियोजन : डिसेंबरच्या दुसऱ्या आठवड्यापासून ताणावर सोडल्यानंतर त्वरीत प्रत्येक झाडाला ४० ते ५० किलो शेणखत टाकून आडवी आणि उभी वखरण करावी. जानेवारीच्या शेवटच्या आठवड्यात किंवा तापमान वाढताच हलके ओलित करावे. ताण तोडतांना हलक्या ओलिताअगोदर प्रत्येक झाडाला ६०० ग्रॅम नत्र + ४०० ग्रॅम स्फुरद + ४०० पालाश आणि भरखते द्यावीत, त्यानंतर पाच ते सात दिवसांनी दुसरे पाणी (चिंबवणी) द्यावे. तिसऱ्या पाळीला भरपूर पाणी द्यावे. ताण सोडल्यावर २० ते २५ दिवसांनी फुले येतात. त्यानंतर उरलेल्या नत्राचा (अर्धा) हप्ता एक ते दीड महिन्याने किंवा फळे वाटाण्याएवढी झाल्यावर द्यावा. हलक्या जमिनीत नत्राची मात्रा तीन ते चार हप्त्यात विभागून दिल्यास जास्त फायदेशीर ठरते.

संत्रा/मोसंबीचे बहार : निसर्गतः संत्रा/मोसंबी फळझाडास वर्षातून तीनदा बहार येतो. त्यापैकी पावसाळ्यात (जून-जुलै) येणाऱ्या बहारास मृग बहार' (मृग नक्षत्रात येणारा) आणि पावसाळा संपल्यानंतर (ऑक्टोबरमध्ये) येणाऱ्या बहारास हस्त बहार' (हस्त नक्षत्रात येणारा) तर थंडी संपतेवेळी (जानेवारी-फेब्रुवारी) म्हणजे आंब्याला ज्या वेळी बहार येतो तो आंबिया बहार' असे तीन बहार वेगवेगळ्या ऋतूंमध्ये येतात.



# रब्बी टोमॅटो लागवडीसाठी 'या' पद्धतीने करा रोपवाटिका व्यवस्थापन

खरीप महिन्यात टोमॅटोची कमी झालेली लागवड आणि पावसामुळे पिकांचे झालेले नुकसान व पर्यायाने उत्पादनात घट यामुळे बरेच शेतकरी आता रब्बी टोमॅटो लागवडीकडे वळण्याची शक्यता आहे. रब्बी हंगामात सप्टेंबर ते ऑक्टोबर या कालावधीत रोपवाटिकेत रोपे तयार केली जातात आणि ऑक्टोबर ते नोव्हेंबर महिन्यात रोपांची पुनर्लागवड केली जाते. रोपवाटिकेत टोमॅटो पिकाचे व्यवस्थापन कसे करायचे याविषयी महत्वाची माहिती जाणून घेऊ या.

रोपवाटिकेत टोमॅटो लागवड व्यवस्थापन :

साधारणपणे सरळ वाणासाठी १६० ग्रॅम बियाणे तर संकरित वाणांसाठी ५० ग्रॅम बियाणे प्रति एकर पुरेसे आहे. लागवडीपूर्वी बियाण्यांना बीजप्रक्रिया करण्यासाठी थायरम किंवा कॅप्टन ३ ग्रॅम किंवा ट्रायकोडर्मा २.५ ग्रॅम प्रति किलो बियाणे याप्रमाणात चोळावे. त्यानंतर ॲझोटोबॅक्टर २.५ ग्रॅम प्रति किलो बियाण्यास चोळावे. साधारणपणे १ एकर क्षेत्रावर लागवड करण्यासाठी १.२ गुंठे क्षेत्रावर रोपवाटिका पुरेशी असते. रोपवाटिकेची जमीन आडवी व उभी नागरून कुळवाच्या दोन पाळ्या द्याव्यात. त्यानंतर ३ मीटर लांब, १ मीटर रुंद आणि १५ सें.मी. उंचीचे गादीवाफे तयार करावेत. गादी वाफ्यामध्ये ५ किलो चांगले कुजलेले शेणखत, ८० ग्रॅम १९:१९:१९ किंवा १०० ग्रॅम १५:१५:१५ आणि २०० ग्रॅम निंबोळी पेंड चांगले मिसळावे. सोबत ट्रायकोडर्मा ५० ग्रॅम एकसारखे मिसळून घ्यावे. जेणेकरून रोप वाटिकेमध्ये मर रोगाचा प्रादुर्भाव टाळला जाईल. गादी वाफ्यावर हाताने किंवा खुरप्याच्या सहाय्याने १० सें.मी. अंतरावर रेषा ओढून त्यामध्ये १ सें.मी. अंतरावर बी पेरावे.

# रब्बी ज्वारी लागवड : जमीन, सुधारित वाण, पेरणी आणि व्यवस्थापन

महाराष्ट्रामध्ये ज्वारी हे एक महत्त्वाचे अन्नधान्य आणि चारा पीक आहे. ज्वारीची लागवड प्रामुख्याने दोन हंगामांत केली जाते खरीप (पावसाळी) आणि रब्बी (हिवाळी). रब्बी ज्वारीचा दर्जा आणि भाकरी अधिक उत्कृष्ट मानली जाते.

जमीन आणि हवामान : हवामान उष्ण आणि कोरडे हवामान ज्वारीसाठी अत्यंत उपयुक्त असते. जमीन: ज्वारीसाठी मध्यम ते भारी, पाण्याचा निचरा होणारी आणि सुपीक जमीन उत्तम ठरते. रब्बी ज्वारीसाठी ओल टिकवून ठेवणारी काळी मध्यम ते खोल जमीन आवश्यक असते.

सुधारित वाण : रब्बी हंगाम: फुले यशोदा, फुले सुचित्रा, फुले वसुधा, फुले अनुराधा (कोरडवाहूसाठी). माळदांडी (च् ३५-१), सी.एस.व्ही. १८, फुले रेवती (बागायती व चांगल्या जमिनीसाठी).

पूर्वमशागत आणि पेरणीचा काळ : पूर्वमशागत: १ उभी-आडवी नांगरणी करून २-३ कुलवाच्या पाळ्या द्याव्यात आणि जमीन समपातळीत करून घ्यावी. पेरणीची वेळ: १५ सप्टेंबर ते १५ ऑक्टोबर (जमिनीत पुरेसा ओलावा असताना पेरणी पूर्ण करावी).

बियाणे आणि बीजप्रक्रिया : बियाण्याचे प्रमाण: प्रति एकरी ३ ते ४ किलो बियाणे लागते. बीजप्रक्रिया: काणी रोगाच्या प्रतिबंधासाठी: प्रति किलो बियाण्याला ४ ग्रॅम गंधक किंवा थायरम चोळावे. नत्र स्थिरीकरण व वाढीसाठी: त्यानंतर २५ ग्रॅम झोटोबॅक्टर आणि २५ ग्रॅम पीएसबी जिवाणू संवर्धन प्रति किलो बियाण्याला लावावे.




पेरणीची पद्धत व अंतर : दोन ओळींमधील अंतर ४५ सेमी (१.५ फूट) आणि दोन रोपांमधील अंतर १५ सेमी ठेवावे. पेरणी पाभरीने (२ चाड्याच्या पाभरीने) करावी, जेणेकरून बियाणे आणि खत एकाच वेळी दिले जाऊ शकते.

खत व्यवस्थापन (प्रति एकर) : सेंद्रिय खत: पेरणीपूर्वी ४ ते ५ ट्रॉली चांगले कुजलेले शेणखत जमिनीत मिसळावे. रासायनिक खत (कोरडवाहू): पेरणीच्या वेळी: २० किलो नत्र (४५ किलो युरिया), १० किलो स्फुरद (६२ किलो एसएसपी) आणि १० किलो पालाश. बागायती ज्वारीसाठी: पेरणीच्या वेळी: २५ किलो नत्र, १२ किलो स्फुरद आणि १२ किलो पालाश. पेरणीनंतर ३० दिवसांनी: उर्वरित २५ किलो नत्र (युरिया) द्यावे.

आंतरमशागत व पाणी व्यवस्थापन : विरळणी व कोळपणी: पेरणीनंतर १५ ते २० दिवसांनी विरळणी करून एका जागी एकच मजबूत रोप ठेवावे. पेरणीनंतर ३ आठवड्यांनी पहिली आणि ५ आठवड्यांनी दुसरी कोळपणी करावी. यामुळे तण नियंत्रण होते आणि जमिनीतील ओलावा टिकून राहतो.

पाणी व्यवस्थापन (रब्बी बागायतीसाठी) : पहिले पाणी: पेरणीनंतर २५ ते ३० दिवसांनी (तांबोट्याची अवस्था). दुसरे पाणी: पेरणीनंतर ४५ ते ५० दिवसांनी (पोटरीची अवस्था).

तिसरे पाणी: पेरणीनंतर ६५ ते ७० दिवसांनी (दाणे भरण्याची अवस्था).

कीड व रोग नियंत्रण : खोडमाशी : पेरणीनंतर ७ ते १० दिवसांत खोडमाशीचा प्रादुर्भाव होतो. याच्या नियंत्रणासाठी पेरणीच्या वेळी जमिनीत 'कार्बोफ्युरॉन ३ जी' किंवा 'फॉरेट १० जी' टाकावे. लष्करी अळी / पोंगा अळी: प्रादुर्भाव दिसल्यास 'एमॅमेक्टिन बेन्जोएट' किंवा 'क्लोरॅंट्रानिलीप्रोल'ची फवारणी करावी.काढणी व उत्पादन : पाने पिवळी पडू लागली आणि दाणे टणक झाले की ज्वारीची काढणी करावी. उत्पादन: कोरडवाहू: ८ ते १२ क्विंटल धान्य आणि १५ ते २० क्विंटल ताट (चारा) प्रति एकर. बागायती: १८ ते २५ क्विंटल धान्य आणि २५ ते ३० क्विंटल ताट प्रति एकर.

# पालकमंत्री पंकजाताई मुंडे यांची जालना जिल्ह्यातील दुष्काळी परिस्थितीवर अधिकाऱ्यांशी चर्चा

## पिण्याचे पाणी, जनावरांना चारा, शेतकऱ्यांना मदतीबरोबरच दुष्काळ निवारणासाठी प्रभावी नियोजन करण्याचे निर्देश

जालना। प्रतिनिधी

जिल्ह्यातील दुष्काळाची तीव्रता लक्षात घेऊन पिण्याचे पाणी, जनावरांसाठी चारा आणि नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना मदत देण्यासाठी प्रभावी नियोजन करावे. पीक पंचनामे तातडीने पूर्ण करून शेतकऱ्यांना मदत मिळवून द्यावी, असे निर्देश राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन तथा जालना जिल्ह्याच्या पालकमंत्री पंकजाताई मुंडे यांनी आज दिले. गांव दत्तक अभियानांतर्गत सर्वांगीण विकासासाठी अंतरवाली सराटी दत्तक घेत असल्याचे सांगून पुढील महिन्यात आपण या गावास भेट देणार असल्याचे त्यांनी सांगितले.

पालकमंत्री ना.पंकजाताई मुंडे आज जालना दौऱ्यावर होत्या, जिल्हाधिकारी कार्यालयात विभाग प्रमुखांच्या बैठकीत त्यांनी जिल्ह्यातील दुष्काळी परिस्थितीचा आढावा घेतला, त्यावेळी त्या बोलत होत्या. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. कृष्ण कांत कनवारीया, मनपा आयुक्त अंजली शर्मा, पोलीस अधिक्षक तेगबीर सिंह संधु, अप्पर जिल्हाधिकारी रमेश मिसाळ, जि प चे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी शिरीष बनसोडे, निवासी उपजिल्हाधिकारी शशिकांत हदगल, उपजिल्हाधिकारी मनिषा दांडगे, जिल्हा अधिक्षक, कृषि अधिकारी गहिनीनाथ कापसे आदी यावेळी उपस्थित होते.यावेळी पालकमंत्री मुंडे पुढे म्हणाल्या की, जिल्ह्यातील ९५४ गावांमध्ये दुष्काळ परिस्थिती असून, या गावातील पीक पंचनामे पूर्ण झाले आहेत. पीकविमा प्रक्रियेतही पारदर्शकता व अचूकता राखण्याच्या सूचना देत, शेतकऱ्यांना पीक



विम्याचा जास्तीत-जास्त लाभ मिळेल यासाठी प्रयत्न करावा असे निर्देश दिले. पिण्याच्या पाण्याला सर्वोच्च प्राधान्य देत टँकरद्वारे होणाऱ्या पाणीपुरवठ्यावर जीपीएस प्रणालीने नियंत्रण ठेवावे, जलस्रोतांचे पुनर्भरण करावे तसेच नदी-नाल्यांचे खोलीकरण करावे, असे त्यांनी सांगितले. पाणी वापरात दहा टक्के कपातीच्या आदेशांची प्रभावी अंमलबजावणी करावी आणि बांधकामांसाठी पिण्यायोग्य पाण्याचा वापर टाळावा, असेही निर्देश त्यांनी दिले. जनावरांसाठी चारा उपलब्ध व्हावा यासाठी चारा साक्षरता अभियान राबवून मुरघास, हायड्रोपोनिक्स व अझोला चारा उत्पादनाचे प्रशिक्षण द्यावे. रोजगार हमी योजनेची कामे जलसंधारणाशी जोडून विहिरींची दुरुस्ती, गाळ काढणे आणि जलस्रोतांचे पुनर्जीवन यांना प्राधान्य द्यावे, असे मुंडे यांनी स्पष्ट केले. दुष्काळ परिस्थितीत शेतकऱ्यांवर मानसिक ताण येऊ नये यासाठी गावपातळीवर मोठ्या प्रमाणावर समुपदेशन व संवाद उपक्रम राबवून त्यांचे मनोबल वाढवावे असे सांगत टंचाईच्या काळात सामुहिक विवाह सोहळ्यांना प्रोत्साहन द्या, पाणी पुरवठा योजनांची वसुली करताना मवाळ धोरण ठेवा असे त्या म्हणाल्या. 'गाव दत्तक अभियान' अंतर्गत दुष्काळग्रस्त गावांना मदत देण्याच्या उपक्रमाचे त्यांनी स्वागत केले. या अंतर्गत सर्वांगीण विकास करण्याच्या उद्देशाने आपण अंतरवाली सराटी गाव दत्तक घेत असल्याचे त्यांनी सांगितले. आचारसंहितेनंतर याठिकाणी आपण भेट देणार असल्याचे त्या म्हणाल्या. दुष्काळग्रस्तांना मदत करताना सीएसआर च्या बरोबरीने गोपीनाथ मुंडे प्रतिष्ठान देखील पुढे राहील असे त्या म्हणाल्या. शेतकरी व ग्रामीण मजुरांना रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी व्हीबी-जी रामजी योजनेंतर्गत रोजगारनिर्मितीची कामे प्रभावीपणे राबवावीत. जलसंधारण, नदी-नाल्यांचे खोलीकरण, गाळ काढणे, जलस्रोतांचे पुनर्भरण आणि विहिरींची दुरुस्ती यांसारख्या कामांना प्राधान्य देऊन शेतकऱ्यांना स्थानिक पातळीवर रोजगार उपलब्ध करून द्यावा. यामुळे दुष्काळग्रस्त कुटुंबांना आर्थिक आधार मिळण्यासोबतच भविष्यातील पाणीटंचाईवर मात करण्यास मदत होईल. पाणीटंचाईग्रस्त गावांमध्ये रिचार्ज शाफ्ट, बंधारे व नाला खोलीकरणासाठी निधी उपलब्ध करून देण्याचे नियोजन करण्यात येणार असून, भविष्यातील दुष्काळाचा सामना करण्यासाठी आतापासूनच उपाययोजना करण्यावर बैठकीत भर देण्यात आला.यावेळी पालकमंत्री पंकजाताई मुंडे यांनी पीक पंचनामे, जिल्ह्यातील प्रकल्पातील पाणीसाठा, टँकरद्वारे पाणीपुरवठा, चारा उपलब्धता, रोजगार हमी योजना आणि शहरी व ग्रामीण भागातील पाणीपुरवठ्याचा आढावा घेतला.

## विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देणाऱ्या उपक्रमांतून सामाजिक बांधिलकी जपली जाते-भास्कर दानवे



जालना । प्रतिनिधी

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त राबविण्यात येत असलेल्या सेवा संकल्प अभियानांतर्गत गुरुवार, दिनांक १५ ऑक्टोबर २०२६ रोजी जुना जालना येथील हिंदू समाज संस्था संचलित रामचंद्र किनगावकर प्राथमिक विद्यालय व बाबुराव जाफराबादकर माध्यमिक विद्यालय येथे चित्रकला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. या स्पर्धेला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.या कार्यक्रमास भाजपा जालना महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी मंडळ अध्यक्ष मोहन राऊत, नगरसेविका अनामिक पांगारकर, संस्थेचे उपाध्यक्ष श्री. रावसाहेबजी अवघड आप्पा, सचिव संजयजी देशपांडे, कोषाध्यक्ष श्री. जुगलकिशोरजी भक्कड, सदस्य भगवान धोत्रे, नितीन कोळेश्वर, जगदीश बडवे, विनायक दसरे तसेच सहसचिव चंद्रशेखर वाघमारे यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

स्पर्धेदरम्यान विद्यार्थ्यांनी विविध विषयांवर सुंदर चित्रे रेखाटून आपल्या कल्पकतेचे आणि कलात्मक कौशल्याचे दर्शन घडविले. निसर्ग, सामाजिक विषय आणि सभोवतालच्या जीवनातील विविध पैलू चित्रांच्या माध्यमातून साकारत विद्यार्थ्यांनी आपल्या भावना व विचार प्रभावीपणे व्यक्त केले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना आपली प्रतिभा सादर करण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध झाले. यावेळी बोलताना भाजपा जालना महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे म्हणाले की, ''प्रत्येक विद्यार्थ्यामध्ये काही ना काही विशेष कलागुण दडलेले असतात. त्यांना योग्य व्यासपीठ, मार्गदर्शन आणि प्रोत्साहन मिळाल्यास ते आपल्या कर्तृत्वाच्या बळावर निश्चितच वेगळी ओळख निर्माण करू शकतात. शिक्षणासोबतच कला, संस्कार आणि सामाजिक जाणीव यांनाही तितकेच महत्त्व आहे. विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास घडवून आणण्यासाठी अशा उपक्रमांची आवश्यकता असून, सेवा संकल्प अभियानाच्या माध्यमातून समाजोपयोगी कार्याला प्रोत्साहन देण्याचा आमचा प्रयत्न आहे. विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासोबतच त्यांच्यामध्ये आत्मविश्वास, सर्जनशीलता आणि सकारात्मक स्पर्धेची भावना निर्माण करण्यासाठी शालेय स्तरावर अशा उपक्रमांचे आयोजन महत्त्वपूर्ण ठरते. विद्यार्थ्यांना आपल्या कल्पना आणि विचार कलात्मक पद्धतीने मांडण्याची संधी मिळाल्याने त्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासालाही चालना मिळते. या चित्रकला स्पर्धेचे आयोजन भाजपा जुना जालना मंडळाचे अध्यक्ष श्री. मोहन राऊत यांच्या वतीने करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या कलागुणांना प्रोत्साहन देणाऱ्या या उपक्रमातून सेवा संकल्प अभियानाचा सामाजिक बांधिलकी, जनसहभाग आणि समाजोपयोगी कार्याचा संदेश देण्यात आला.

## मुंगूसवाडे येथील पाणीपुरवठा कर्मचारी चौकशीच्या भवऱ्यात ?

### नियुक्ती प्रक्रियेवर प्रश्नचिन्ह? ग्रामपंचायत प्रशासकीय कालखंड ग्रामनिधी खर्चाच्या चौकशीचीही मागणी

पाथर्डी । प्रतिनिधी

ग्रामपंचायत मुंगूसवाडे येथील पाणीपुरवठा कर्मचाऱ्याच्या नियुक्ती प्रक्रियेबाबत दाखल झालेल्या तक्रारीने आता प्रशासकीय स्तरावर लक्ष वेधले आहे नियुक्तीची वैधता संबंधित कागदपत्रांची उपलब्धता आणि प्रशासकीय कालखंडात ग्रामनिधीतून करण्यात आलेल्या खर्चाची पडताळणी या मुद्द्यांवरून चौकशीची मागणी माजी उपसरपंच गयाबाई सखाराम खेडकर यांच्यावतीने करण्यात आली आहे

गयाबाई सखाराम खेडकर यांनी त्यांच्या दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने पंचायत समिती पाथर्डी येथून चौकशी करून अहवाल सादर करण्याबाबत पत्रव्यवहार झाल्याने या प्रकरणाला महत्त्व प्राप्त झाले आहे पाणीपुरवठा कर्मचारी रामनाथ नवनाथ खेडकर यांच्या नियुक्तीसंदर्भात आवश्यक नियमांचे पालन झाले होते का नियुक्तीचा ठराव नियुक्ती आदेश आणि संबंधित अभिलेख उपलब्ध आहेत का तसेच नियुक्तीची प्रक्रिया नियमानुसार पूर्ण करण्यात आली होती का याची तपासणी करण्याची मागणी तक्रारीत करण्यात आली आहे त्यामुळे चौकशीदरम्यान उपलब्ध कागदपत्रे आणि प्रशासकीय नोंदींच्या आधारे वस्तुस्थिती स्पष्ट होणे महत्त्वाचे ठरणार आहे या प्रकरणासोबतच ग्रामपंचायतीच्या प्रशासकीय कालखंडात ग्रामनिधीतून वितरित करण्यात आलेल्या रकमेच्या खर्चाचीही चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे संबंधित रकमा कोणत्या कारणासाठी अदा करण्यात आल्या त्यासाठी आवश्यक मंजुरी व आदेश होते का तसेच देयके व्हाउचर आणि लेखा नोंदी यांमध्ये सुसंगती आहे का याची पडताळणी करण्याची मागणी करण्यात आली आहे तक्रारीच्या अनुषंगाने संबंधित कागदपत्रांची तपासणी करून सविस्तर चौकशी अहवाल सादर करणे अपेक्षित आहे या चौकशीत नियुक्ती प्रक्रियेबाबतची वस्तुस्थिती आणि ग्रामनिधी खर्चासंदर्भातील नोंदी स्पष्ट होतात का याकडे ग्रामस्थांचे लक्ष लागले आहे तक्रारीतील मुद्द्यांची निष्पक्ष पडताळणी करून वस्तुस्थिती अहवालातून स्पष्ट करावी आणि नियमभंग आढळल्यास संबंधितांवर नियमानुसार कार्यवाही करावी अशी मागणी करण्यात येत आहे आता पंचायत समिती स्तरावरील चौकशीत कोणती तथ्ये समोर येतात आणि संबंधित प्रकरणाबाबत कोणता निष्कर्ष नोंदवला जातो याकडे मुंगूसवाडे ग्रामस्थांचे लक्ष लागले आहे.

## टेंभुर्णी येथील क्षेत्र नर्मदेश्वर गडाचा ब वर्ग दर्जा तीर्थक्षेत्र योजनेत समावेश

पाथर्डी। प्रतिनिधी

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर ग्रामीण यात्रास्थळ योजनेअंतर्गत बीड जिल्ह्यातील शिरूर कासार येथील टेंभुर्णी गावातील महादेव मंदिर श्री क्षेत्र नर्मदेश्वर गडाचा शासनाच्या ग्रामीण विकास मंत्रालयाच्या शासन निर्णय तीर्थवी सप्टेंबर २०२६ इ /१८४९२१३ महादेव मंदिर तीर्थक्षेत्र व यात्रा स्थळाला ब दर्जा प्रदान करण्यात आला आहे ग्रामविकास विभागाच्या वतीने उपसचिव प्रशांत पाटील यांनी तसा अध्यादेश महाराष्ट्र शासन आणि राज्यपालांच्या अधिस्वाक्षरीने जारी केला आहे यासाठी टेंभुर्णी गावचे सरपंच व शिक्षक नेते मिथुन डोंगरे यांनी आष्टी पाटोदा शिरूर मतदार संघाचे आमदार सुरेश धस यांच्याकडे वेळोवेळी पाठपुरावा केला होता टेंभुर्णी येथील महादेव मंदिर श्री क्षेत्र नर्मदेश्वर गडाचा ब दर्जा प्राप्त झाल्याने गावकऱ्यांनी ग्रामविकासमंत्री जयकुमार गोरे आमदार सुरेश धस यांचे आभार मानले आहेत.



टेंभुर्णी गावच्या मूलभूत सोयी सुविधा व सर्वांगीण विकासासाठी कटीबद्ध असून व पवित्र महादेव मंदिर श्री क्षेत्र नर्मदेश्वर गडाचा आध्यात्मिक सामाजिक पर्यटन विकास साध्य करण्याचे उद्दिष्ट डोळ्यासमोर आहे येणाऱ्या काळात महादेव मंदिर नर्मदेश्वर गडाच्या माध्यमातून मोठे आध्यात्मिक केंद्र व पर्यटन स्थळ उभारण्यासाठी गावकऱ्यांचे सहकार्य अपेक्षित आहे

– मिथुन डोंगरे (सरपंच टेंभुर्णी)

## पाथर्डी वकील संघ अध्यक्षपदी राणा खेडकर यांची निवड

पाथर्डी । प्रतिनिधी

पाथर्डी वकील संघाच्या अध्यक्षपदी एडवोकेट राणा खेडकर यांची फेरनिवड करण्यात आली असून गेल्या पाच वर्षापासून राणा खेडकर हे गेल्या पाच वर्षापासून पाथर्डी वकील संघ संघटनेचे प्रतिनिधित्व करत आहेत वकील संघाच्या अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल बोलताना एड.राणा खेडकर यांनी सांगितले की वार्षिक सर्वसाधारण आणि कार्यकारी समितीच्या बैठकांचे अध्यक्षपद भूषवताना संघटनेच्या हिताचे निर्णय घेताना सर्व सदस्यांना सोबत घेणार आणि मतभेद झाल्यास त्यावर सुवर्णमध्य काढला जाईल वकिलांच्या हक्कांचे आणि हितांचे रक्षण कनिष्ठ व ज्येष्ठ वकिलांना येणाऱ्या अडीअडचणी चेंबर किंवा इतर पायाभूत सुविधांची टंचाई दूर करण्यासाठी प्रयत्न करेल वकिलांसाठी आरोग्य विमा पेन्शन किंवा अपघाती विमा यांसारख्या कल्याणकारी योजना राबवण्यावर भर असेल नवीन येणाऱ्या वकिलांना मानधन मार्गदर्शन आणि योग्य



वातावरण मिळवून देणे न्यायाधीश न्यायालयीन कर्मचारी आणि वकील यांच्यात उत्तम समन्वय आणि आदरयुक्त संबंध राखण्यात महत्त्वाची भूमिका पार पाडू न्यायालयात वकिलांना काही प्रशासकीय अडचणी आल्यास मुख्य न्यायाधीशांशी किंवा प्रशासनाशी चर्चा करून त्या सोडवून शासकीय सामाजिक किंवा राज्य बार कौन्सिलच्या पातळीवर स्थानिक वकील संघाचे अधिकृत प्रतिनिधित्व करणे सामान्य जनतेसाठी मोफत कायदेशीर सल्ला शिबिरे आयोजित करणे आणि वकिलांसाठी कायदेविषयक कार्यशाळा घेणे शिस्त आणि व्यावसायिक नैतिकता राखणे वकील व्यवसायाची प्रतिष्ठा आणि आचारसंहिता पाळली जाईल याकडे लक्ष देण्याचा नेहमी प्रयत्न राहील.

## जिल्ह्यात राष्ट्रवादी युवक पक्षाची बांधणी मोठ्या ताकदीने करा-निखिल ठाकरे

जालना। प्रतिनिधी

राष्ट्रवादी युवक काँग्रेस पक्ष संघटनेची बांधणी मोठ्या ताकदीने करा असे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेशाध्यक्ष निखिल ठाकरे यांनी जालना येथील जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या कार्यालयात (दि. १४) बुधवार रोजी आयोजित मेळाव्यात युवकांना मार्गदर्शन करताना केले. प्रदेशाध्यक्ष ठाकरे यांची नियुक्ती झाल्यानंतर प्रथमच ते जालना जिल्हा दौऱ्यावर आले असता प्रदेश राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे सरचिटणीस धैर्यशील चव्हाण यांनी युवक मेळावा व मराठवाडा पदवीधर मतदार संघाच्या निवडणुकी संदर्भात मार्गदर्शन मेळावा आयोजित केला होता. या मेळाव्यास राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे मुख्य प्रदेश सरचिटणीस अमर पाटील, जिल्हाध्यक्ष अरविंदराव चव्हाण , महिला प्रदेश सरचिटणीस शकुंतला कदम, प्रदेश सरचिटणीस रवींद्र तौर, प्रदेश सचिव राहुल खारवणे,विधानसभा अध्यक्ष भाऊसाहेब गोरे, लक्ष्मण दळवी, जयमंगल जाधव, मारुती आप्पा अवरगंड, धैर्यशील चव्हाण, नितीन जेथलिया ,विनायक चोथे , जिल्हा उपाध्यक्ष अण्णासाहेब चित्तेकर, शहराध्यक्ष शेख महमूद , कार्याध्यक्ष मिर्झा अन्वर बेग, युवक जिल्हाध्यक्ष ज्ञानेश्वर



सरकटे यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी बोलताना प्रदेशाध्यक्ष ठाकरे म्हणाले की, काम करताना संघर्ष करावा करावाच लागतो . संघर्षातूनच माणूस परिपक्व होतो. सत्ता देखील तुमच्या पायाशी लोळण घालते. कोणत्याही क्षेत्रात नितीमत्ता जिवंत असणारे कार्यकर्ते नेहमीच सोबत राहतात. मी संघटनेतून तयार झालेला कार्यकर्ता आहे. त्यामुळे युवकांनी संघटनेचे विस्तीर्ण रूप जिल्ह्यात निर्माण करावे असे यावेळी ते म्हणाले. तसेच मराठवाडा पदवीधर मतदारसंघाचे उमेदवार सतीश चव्हाण यांच्या विजयासाठी युवकांनी परिश्रम करून त्यांना भरघोस मताने निवडून आणावे असे आवाहन त्यांनी यावेळी केले.मुख्य प्रदेश सरचिटणीस अमर पाटील म्हणाले की, अजितदादा आज आपल्यात नाही . परंतु त्यांचे विचार आपल्या सोबत आहे. त्यांचे विचार व कामाच्या माध्यमातून आपल्याला पक्षाची बांधणी मजबूत करावयाची आहे . यावेळी जिल्हाध्यक्ष अरविंदराव चव्हाण महिला प्रदेशसरचिटणीस शकुंतला कदम,धैर्यशील चव्हाण नितीन जेथलिया, विनायक चोथे यांनी ही आपल्या भाषणात सतिष चव्हाण यांना निवडून आणण्याचा निर्धार केला. यावेळी माजी जि.प.सदस्य केशव जंजाळ, तालुकाध्यक्ष कैलास मदन, सुरेश सपाटे, बाबासाहेब घाडगे, दिलीप चव्हाण, संतोष ढेंगळे, जिल्हा उपाध्यक्ष मदनराव तुपे, युवक शहर जिल्हाध्यक्ष प्रवीण शिंदे,राम घोगरे,प्रा.सोपानराव तेलगड, युवती जिल्हाध्यक्ष शितल बारोटे, शहराध्यक्ष रिंकल तायड, सेवादलाचे जिल्हाध्यक्ष पद्माकर हांडे, किसान सभा जिल्हाध्यक्ष गणेश डुकरे, राष्ट्रवादी काँग्रेस ओबीसीचे जिल्हाध्यक्ष मयूर गाडेकर, सतिष वाहूळे,सतीश ढवळे , संतोष पुंगळे, सतिष धुपे, उमेश मोहिते, किशोर सवडे, कृष्णा गाडेकर, शेख सलीम, शेख समद,अजहर शेख, गोवर्धन डोंगरे, विष्णू गायकवाड , संदीप पाटोळे,समाधान राठोड, राहुल राठोड ,सिद्धेश्वर शिंदे , संदीप राठोड, विशाल मोठे, मनोज चांदगुडे, दिलीप तात्या क्षीरसागर, विष्णू घुले, पुंजाराम मोहिते , भागवत मस्के, डॉ. गोविंद वाघ, भगवान दाभाडे,राहुल कळकुंबे, नवनाथ लोखंडे यांच्यासह अनेकांची यावेळी मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

## लेखापालला धमकावल्याप्रकरणी संबंधित व्यक्तीवर कठोर कारवाई करा



जालना । प्रतिनिधी

परतूर नगरपालिका लेखापाल यांना धमकी दिल्याप्रकरणी संबंधित व्यक्तीवर कठोर कारवाई करण्यात यावे असे मागणी करण्यात आली.जालना जिल्हा संवर्ग अधिकारी-कर्मचारी संघटनेचा अन्यायाविरुद्ध आवाज! परतूर नगरपरिषद येथे घडलेल्या घटनेच्या अनुषंगाने अधिकारी व कर्मचारी यांच्या सन्मानाचा, सुरक्षिततेचा आणि निर्भयपणे काम करण्याच्या अधिकाराचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. या प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर योग्य ती कायदेशीर कारवाई करावी, तसेच अधिकारी व कर्मचाऱ्यांना सुरक्षित आणि भयमुक्त वातावरणात काम करता यावे, या मागणीसाठी मा. जिल्हाधिकारी , मा. पोलीस अधीक्षक व मा. जिल्हा प्रशासन अधिकारी जालना यांना जालना जिल्हा संवर्ग अधिकारी-कर्मचारी संघटनेच्या वतीने निवेदन सादर करण्यात आले.या वेळी संघटनेचे अध्यक्ष श्री. चंद्रकांत दामोधर व श्री. रघुराज चव्हाण,सौ. वैशिखा साळवे,सौ.कल्याणी यादव,श्री. अमित गुंटूक,श्री.अविनाश चव्हाण,श्री.सचिन घुले ,श्री. सुधीर जाधव ,श्री.संदीप वानखेडे,श्री. शशिकांत सरकटे,श्री. पाजगे,श्री.चंदेश तायडे ,श्री. ममदापूरे,,श्री.संकेत देशमुख,व इतर कर्मचारी उपस्थित होते.

# ग्रामीण भागात ९६० रुपयाचे सिलेंडर १६०० रुपयात ; लूट कधी थांबणार

बीड । प्रतिनिधी

केंद्र शासनाने सिलेंडरचे दर निश्चित केलेले असतानाही ग्रामीण भागामध्ये उज्वला व रेगुलर घरगुती वापराचे गॅस सिलेंडर ९६० ऐवजी १६०० रुपयाला वितरक देत असल्याने ग्रामीण भागातील नागरिक तक्रार कोणाकडे करायची असा प्रश्न त्यांच्यासमोर पडला आहे यावर नियंत्रण नसल्यानेच खुलेआम लूट होत असल्याचे बोलले जात आहे.



शहरी भागामध्ये घरगुती वापराचे गॅस सिलेंडर नंबर लावून वितरित केला जातो तशी ऑनलाइन नोंदणीची पद्धतच आहे परंतु शहरी भागात गॅस सिलेंडरची टाकी ९६० रुपयाला दिली जाते मात्र वितरण वितरणाचे अधिकचे दहा वीस रुपये घेतच असतो ग्रामीण भागामध्ये नोंदणी केलेल्या उज्वला असो की रिप्लाय गॅस सिलेंडर पोहोच करण्यासाठी ९६० घ्यावेत प्रवास गृहीत धरला तर किमान एक हजार रुपये घ्यावेत चक्क ग्रामीण भागातील नागरिकांना हाच गॅस सिलेंडर १६०० रुपयाला दिल्या जात असल्याच्या तक्रारी आता दिवसेंदिवस वाढत आहेत प्रामुख्याने जिल्हा पुरवठा अधिकारी जिल्हाधिकारी यांनी या बाबीकडे लक्ष द्यावे अशी मागणी होत आहे बीड शहरामध्ये देखील काही विचार अधिकच्या रकमा ग्राहकाकडून घेतात ग्रामीण भागामध्ये तक्रार कोण करणार असा प्रश्न निर्माण होतो अनेक वेळा त्यांना पावती दिली जात नाही हा सर्व प्रकार बीड जिल्ह्यातील ग्रामीण भागामध्ये सुरू असून वितरकांनी किमान ग्रामीण भागात ९६० आणि अधिकचे काही घेतले तरी चालेल मात्र सोळाशे रुपये म्हणजेच ही रक्कम दुप्पट होते तेव्हा या विषयाकडे प्रशासनाने गांभीर्याने पाहावे अशी मागणी होते.

## सिलेंडर नाही पण अनुदान मिळते

**बीड जिल्ह्यामध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सुरू केलेल्या ग्रामीण भागासाठीच्या उज्वला योजनेअंतर्गत गॅस सिलेंडर देण्यात आले प्रामुख्याने ग्रामीण भागामध्ये एक सिलेंडर किमान तीन ते चार महिने चालते परंतु प्रत्येकी दोन ते तीन महिन्याला सिलेंडर न घेत आहे अनेक महिलांच्या नावावर दोनशे रुपयांचे अनुदान बँक खात्यावर जमा होते मग हे वितरक सिलेंडरचा वापर कशासाठी करतात हा मोठा प्रश्न आहे**

# २६ गावांसाठी ठिबक उपसा जलसिंचन योजनेची जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटलांकडे आ.प्रकाश सोळंकेची मागणी

माजलगाव । प्रतिनिधी

नांदेड येथे राज्याचे जलसंपदा मंत्री श्री. राधाकृष्ण विखे पाटील यांची दि १५ ऑक्टोबर गुरुवार रोजी माजलगाव विधानसभा मतदारसंघातील शिष्टमंडळाने भेट घेतली.यावेळी शिष्टमंडळासमवेत आ.प्रकाश सोळंके यांनी उपस्थित राहून मतदारसंघातील सिंचनविषयक विविध प्रलंबित प्रश्न व आवश्यक उपाययोजनांबाबत मागण्या मांडल्या.



मतदारसंघातील सिंचन सुविधांचा विस्तार, उपलब्ध जलस्रोतांचा नियोजनबद्ध वापर आणि सिंचनापासून वंचित असलेल्या गावांना पाणी उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने या मागण्यांचा पाठपुरावा करण्यात येत आहे.

-आमदार प्रकाश सोळंके

२६ गावांसाठी नवीन उपसा जलसिंचन योजना.कुंडलिका लाभक्षेत्रातील शेतकऱ्यांना बंदिस्त पाइपलाइनद्वारे सिंचनासाठी पाणी उपलब्ध करून देण्याची मागणी करण्यात आली. तसेच जायकवाडी टप्पा-२ अंतर्गत माजलगाव प्रकल्पातून नवीन उपसा जलसिंचन योजना मंजूर करण्याबाबत प्रस्ताव मांडण्यात आला.या योजनेमुळे माजलगाव, कुंडलिका व सरस्वती प्रकल्पांच्या लाभक्षेत्रापासून वंचित असलेल्या पात्रुड, राजेवाडी, लमाणवाडी, लहामेवाडी, शिंदेवाडी, गुजरवाडी, टकारवाडी, नित्रुड, तेलगाव, भोपा, बडेवाडी, बाभळगाव, संगम, नाखलगाव, दिंद्रुड, पिंपळगाव, वांगी, खाडेवाडी, टालेवाडी, शिंदेवाडी, आलापूर, बेलुरा, देवळा, देवठाणा, चिखली, जवळा आणि देव दहिफळ या गावांतील हजारो हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली आणणे शक्य होणार आहे.

सदर मागणीची दखल घेत जलसंपदा मंत्री श्री. राधाकृष्ण विखे पाटील यांनी संबंधित अधिकाऱ्यांना ◀◀ पान ३ वर

# महेंद्रवाडी घाट परिसरात तीन बिबट्यांचे दर्शन वाहनचालक व नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण

पाटोदा । प्रतिनिधी

महेंद्रवाडी घाटाच्या पायथ्याशी एकाच वेळी तीन बिबट्यांचे दर्शन झाल्याची थरारक घटना समोर आली आहे. या प्रकारामुळे या मार्गावरून ये-जा करणाऱ्या प्रवास करणाऱ्या नागरिकांमध्ये, वाहनचालकांमध्ये आणि परिसरातील शेतकऱ्यांमध्ये मोठी दहशत पसरली आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, महेंद्रवाडी घाट आणि त्याच्या पायथा परिसरामध्ये तीन बिबटे एकाच वेळी फिरताना निदर्शनास आले आहेत. या वन्यप्राण्यांच्या वावरामुळे रात्रीच्या वेळी किंवा पहाटेच्या सुमारास या मार्गावरून प्रवास करणाऱ्यांच्या जीवाला मोठा धोका निर्माण झाला आहे. शेतीची कामे करण्यासाठी किंवा इतर कामांसाठी येणाऱ्या ग्रामस्थांनीही या भागात मोठी सावधानी बाळगणे आवश्यक झाले आहे.

नागरिकांसाठी आणि वाहनचालकांसाठी महत्त्वाचे आवाहन:

रात्रीचा प्रवास टाळावा: विशेषतः संध्याकाळनंतर आणि रात्रीच्या वेळेस या मार्गावरून एकट्याने किंवा दुचाकीवरून प्रवास करणे टाळावे.

वाहनचालकांनी ठेवावे लक्ष: घाटातून किंवा पायथ्याकडून जाताना वाहनचालकांनी वाहनाचा वेग नियंत्रित ठेवावा आणि रस्त्याच्या कडेला लक्ष ठेवावे.

परिसरातील शेतकऱ्यांनी शेतात जाताना सोबत टॉर्च, काठी किंवा आवाज करणाऱ्या वस्तू ठेवाव्यात जेणेकरून सुरक्षेच्या दृष्टीने मदत होईल. पाळीव प्राण्यांची सुरक्षा: रात्रीच्या वेळी पाळीव जनावरे सुरक्षित ◀◀ पान ३ वर

# गेवराई बसस्थानकात वृद्धेचे मंगळसूत्र लांबवणारी महिला जेरबंद; ६४ हजारांचा मुद्देमाल हस्तगत

गेवराई । प्रतिनिधी

गेवराई बसस्थानकात एसटी बसमध्ये चढताना गर्दीचा गैरफायदा घेऊन एका वृद्ध महिलेच्या गळ्यातील सोन्याचे मंगळसूत्र चोरणाऱ्या सराईत महिला चोराला गेवराई पोलिसांनी शिताफीने अटक केली आहे. तिच्याकडून ६४ हजार रुपये किमतीचे ८ ग्रॅम वजनाचे सोन्याचे मंगळसूत्र जप्त करण्यात आले आहे.



याबाबत सविस्तर वृत्त असे की, दिनांक २३ सप्टेंबर २०२६ रोजी सायंकाळी पावणेसातच्या सुमारास सुमन मल्हारी पाचपुते (वय ६५ वर्षे, रा. बोरी पिंपळगाव, ता. गेवराई) या गेवराई बसस्थानकातून गेवराई ते गुळज जाणाऱ्या बसमध्ये चढत होत्या. त्यावेळी गर्दीचा फायदा घेत अज्ञात चोरट्याने त्यांच्या गळ्यातील ८ ग्रॅम वजनाचे सोन्याचे मणी मंगळसूत्र (किंमत अंदाजे ६४,००० रुपये) चोरून नेले. याप्रकरणी सुमन पाचपुते यांच्या फिर्यादीवरून गेवराई पोलीस ठाण्यात कलम ३०३(२) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

घटनेचे गांभीर्य ओळखून गेवराई पोलिसांनी तातडीने तपासाची चक्रे फिरवली. गोपनीय माहितीदाराकडून मिळालेल्या माहितीच्या आधारे पोलिसांनी संशयित महिला जयश्री संतोष जाधव (वय ३० वर्षे, रा. माऊली नगर, नाळवंडी नाका, बीड) हिला ताब्यात घेऊन चौकशी केली. पोलीस कोठडीदरम्यान तिने गुन्ह्याची ◀◀ पान ३ वर

# शेताच्या वादातून शिवीगाळ व मारहाण; पाटोदा पोलीस ठाण्यात चौघांवर अदखलपात्र गुन्हा दाखल

पाटोदा । प्रतिनिधी

शेताच्या कारणावरून झालेल्या वादातून एका ६८ वर्षीय वृद्धाला शिवीगाळ करत लाथाबुक्क्यांनी मारहाण केल्याची आणि जीवे मारण्याची धमकी दिल्याची घटना वाघिरा (ता. पाटोदा) येथे घडली आहे. या प्रकरणी पाटोदा पोलीस ठाण्यात चार जणांविरुद्ध अदखलपात्र गुन्हा (छ.उ. छे. ४९४/२०२६) नोंदवण्यात आला आहे.

घटनेचा तपशील:

पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, तक्रारदार शहादेव उमाजी बावणे (वय ६८ वर्ष, रा. वाघिरा, ता. पाटोदा, जि. बीड) यांचे वाघिरा शिवारातील शेत गट क्र. ५८७ मध्ये शेत आहे. दिनांक १३/१०/२०२६ रोजी दुपारी सुमारे १:०० वाजण्याच्या सुमारास, तक्रारदार व आरोपींचे शेत एकमेकांच्या शेजारी असल्याने शेत आमचे आहे असे म्हणून भांडणाची कुरापत काढण्यात आली.

या वेळी संशयित आरोपी भीमराव शामराव बावणे, इंदुबाई भीमराव बावणे, सिताराम भीमराव बावणे आणि चंद्रकला सिताराम बावणे (सर्व रा. वाघिरा, ता. पाटोदा) यांनी आपापसात संगनमत करून तक्रारदारास लाथाबुक्क्यांनी व चप्पलेने मारहाण केली. तसेच शिवीगाळ करून तुला जिथेच मारून टाकू अशा प्रकारच्या जीवे मारण्याच्या धमक्या दिल्या.

पोलीस कारवाई:

या घटनेबाबत दिनांक १६/१०/२०२६ रोजी पाटोदा पोलीस ठाण्यात तक्रार नोंदवण्यात आली असून भारतीय न्याय संहिता (इ.छ.ड.) २०२३ च्या कलम ११५(२), ३५२, ३५१(२) आणि ३(५) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलीस उपनिरीक्षक उमाशंकर मन्मथ कस्तुरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस अंमलदार भोसले (पोहेकॉ/२२०) या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत. तक्रारदारास न्यायालयात दाद मागण्याची समज देण्यात आली आहे.

# श्रीक्षेत्र मच्छिंद्रनाथ गड मायंबा येथे दसरा मेळावा, संत-महंत आणि आ.धस यांच्या उपस्थितीत होणार धार्मिक सोहळा

## नाथभक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे -ॲड.साहेबराव म्हस्के

**आष्टी । प्रतिनिधी**

आष्टी तालुक्यातील सावरगाव घाट येथील श्रीक्षेत्र मच्छिंद्रनाथ गड मायंबा येथे मंगळवार, दि. २० ऑक्टोबर रोजी सकाळी १०.३० वा.दसरा मेळाव्याचे १८ वे वर्ष साजरे होत असून, साधुसंत, महंत आणि गडाचे विश्वस्त आ.सुरेश धस यांच्या उपस्थितीत हा धार्मिक सोहळा पार पडणार आहे. नाथ संप्रदायाची परंपरा, श्रद्धा आणि भक्तिभाव जपणाऱ्या या मेळाव्याला नाथभक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन गडाचे विश्वस्त ॲड. साहेबराव म्हस्के यांनी केले आहे. श्रीक्षेत्र मच्छिंद्रनाथ गड मायंबा हे नाथ संप्रदायातील भाविकांचे श्रद्धास्थान असून, येथे वर्षभर विविध धार्मिक कार्यक्रमांच्या माध्यमातून परंपरा जपली जाते. दसरा मेळावा हा या परंपरेतील महत्त्वाचा सोहळा मानला जातो. या सोहळ्याच्या निमित्ताने गडावर धार्मिक वातावरण निर्माण होणार आहे, नाथभक्तांना या मंगलमय सोहळ्यात सहभागी होण्याची संधी मिळणार आहे.





नाथ संप्रदायाची समृद्ध परंपरा पुढील पिढीपर्यंत पोहोचावी, भाविकांमधील श्रद्धा आणि भक्तिभाव अधिक दृढ व्हावा, तसेच गडाशी जोडलेल्या सेवेकरी आणि नाथभक्तांचा सहभाग वाढावा, या भावनेतून गेल्या १८ वर्षापासून दसरा मेळाव्याचे आयोजन करण्यात येत असून सर्वांनी या मेळाव्याला उपस्थित राहावे, असे आवाहन ॲड. साहेबराव म्हस्के यांनी केले आहे.नाथभक्तांनी मंगळवार, दि. २० ऑक्टोबर रोजी सकाळी १०.३० ते ११.४५ यावेळेत श्रीक्षेत्र मच्छिंद्रनाथ गड मायंबा येथे उपस्थित राहून दसरा मेळाव्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन गडाचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, सचिव आणि विश्वस्त मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे.

# बीडच्या पाणी पुरवठा योजनेसाठी अतिरिक्त विद्युत भार मंजूर करावा

## डॉ.योगेश क्षीरसागर यांची राज्यमंत्री मेघनाताई बोर्डीकरांकडे मागणी; संपर्क कार्यालयात सत्कार

बीड । प्रतिनिधी

दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर बीड शहरातील पाणीपुरवठ्याचा प्रश्न गंभीर होत चालला असून, शहराच्या पाणीपुरवठा योजनेसाठी अतिरिक्त विद्युत भार मंजूर करावा, अशी मागणी भाजप नेते डॉ. योगेश क्षीरसागर यांनी ऊर्जा व पाणी पुरवठा राज्यमंत्री मेघनाताई बोर्डीकर यांच्याकडे निवेदनाद्वारे केली.



राज्याच्या सार्वजनिक बांधकाम (उपक्रम), आरोग्य व कुटुंब कल्याण, पाणी पुरवठा, ऊर्जा तसेच महिला व बालविकास विभागाच्या राज्यमंत्री मेघनाताई बोर्डीकर यांनी शुक्रवारी (दि.१६) बीड दौऱ्यादरम्यान भाजप नेते डॉ.योगेश क्षीरसागर यांच्या संपर्क कार्यालयास सदिच्छा भेट दिली. यावेळी डॉ.योगेश क्षीरसागर आणि माजी नगराध्यक्षा डॉ.दीपाताई क्षीरसागर यांनी सहकाऱ्यांसह त्यांचा सत्कार केला. या भेटीदरम्यान बीड मतदारसंघातील विविध प्रलंबित प्रश्न आणि विकासकामांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. डॉ.योगेश क्षीरसागर यांनी शहराशी संबंधित महत्त्वाच्या मागण्यांची निवेदने मंत्र्यांना सादर केली. निवेदनात म्हटले आहे की, यंदा राज्यात दुष्काळ जाहीर झाल्याच्या पार्श्वभूमीवर बीड शहरातील पाणी पुरवठ्याचा प्रश्न अधिक गंभीर झाला आहे. 'अमृत अटल पाणीपुरवठा योजने'साठी आवश्यक विद्युत भार उपलब्ध नसल्यामुळे संपूर्ण शहराला तब्बल १० ते १५ दिवसांच्या अंतराने पाणीपुरवठा होत आहे. नगरपरिषदेची थकबाकी असल्याने वीज विभागाकडून अतिरिक्त विद्युत भार मंजूर केला जात नसल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. त्यामुळे अडीच लाख नागरिकांच्या पाणीसमस्येवर तोडगा काढण्यासाठी हा प्रश्न मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासमोर मांडून अतिरिक्त विद्युत भार मंजूर करून द्यावा, अशी आग्रही मागणी डॉ.योगेश क्षीरसागर यांनी केली. यासह अन्य मागण्यांवर सकारात्मक निर्णय घेण्यात येईल. तसेच आवश्यक पाठपुरावा करून बीडच्या विकासासाठी पुरेसा निधी उपलब्ध करून दिला जाईल, अशी ग्वाही राज्यमंत्री मेघनाताई बोर्डीकर यांनी यावेळी दिली. याप्रसंगी नगरसेवक, पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### ३३ केव्ही वीज उपकेंद्रांसाठी पाठपुरावा सुरू

बीड विधानसभा मतदारसंघातील शहरासह ग्रामीण भागातील विजेसंबंधी विविध प्रश्न डॉ.योगेश क्षीरसागर यांनी राज्यमंत्री मेघनाताई बोर्डीकर यांच्यासमोर मांडले. मतदारसंघातील विविध ठिकाणी नवीन ३३ केव्ही वीज उपकेंद्रे उभारण्यात यावीत, यासाठी त्यांनी यापूर्वीच मंत्रालयात निवेदन सादर केले आहे. या मागण्यांसाठी सातत्याने पाठपुरावा सुरू असल्याचे त्यांनी सांगितले.

# २०२५-२६ च्या पीकविम्याचा प्रश्न मार्गी लावा अन्यथा जागर प्रतिष्ठान आक्रमक भूमिका घेणार!

माजलगाव । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांना २०२५-२६ या वर्षाचा हक्काचा पीकविमा मिळावा, यासाठी जागर प्रतिष्ठानच्या माध्यमातून करण्यात आलेल्या उपोषणाच्या पार्श्वभूमीवर प्रतिष्ठानचे अध्यक्ष किसन पाटील चव्हाण यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने राज्याचे कृषिमंत्री दत्तात्रय मामा भरणे यांची भेट घेतली. यावेळी पीकविम्याचा प्रलंबित प्रश्न मार्गी लावण्याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली.

बीड जिल्ह्यातील शेतकरी पीकविम्याच्या प्रतीक्षेत असून, त्यांना हक्काची विमा रक्कम मिळावी, ही जागर प्रतिष्ठानची प्रमुख मागणी आहे. या प्रश्नाकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी यापूर्वी प्रतिष्ठानच्या वतीने उपोषण करण्यात आले होते. याच अनुषंगाने कृषिमंत्र्यांची भेट घेऊन शेतकऱ्यांची भूमिका मांडण्यात आली.लवकरात लवकर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासोबत बैठक घडवून आणून शेतकऱ्यांच्या पीकविम्याचा प्रश्न निकाली काढावा आणि शेतकऱ्यांच्या हक्काचे पैसे त्यांना मिळवून द्यावेत, अशी मागणी यावेळी करण्यात आली. तसेच, या प्रश्नावर लवकर निर्णय न झाल्यास जागर प्रतिष्ठानच्या माध्यमातून आक्रमक भूमिका घेण्यात येईल, असा इशाराही शिष्टमंडळाने दिला.या भेटीदरम्यान जागर प्रतिष्ठानचे अध्यक्ष किसन पाटील चव्हाण यांच्यासह विशाल जाधव,ड. ओंकार डोंबे (हिंगोली), हरिओम राखुंडे (अकोला),दिनेश चव्हाण (यवतमाळ), केशव शिंदे (बीड), ड.उदय नागवडे (पुणे), संगम चाळक (बीड) आदी उपस्थित होते.



**कृषिमंत्री दत्तात्रय मामा भरणे यांच्यासोबत शिष्टमंडळाची बैठक**

# जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या हस्ते कर्करोग तपासणीसाठी मोबाईल मेडिकल युनिटचा शुभारंभ

बीड । प्रतिनिधी

ग्रामीण भागातील नागरिकांना त्यांच्या गावातच कर्करोग तपासणीची सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी संकल्प कॅन्सर स्क्रीनिंग प्रकल्पांतर्गत मोबाईल मेडिकल युनिटचा शुभारंभ जिल्हाधिकारी कार्यालयाच्या परिसरात करण्यात आला. यावेळी जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या हस्ते कर्करोग तपासणीसाठी मोबाईल मेडिकल युनिटचे उद्घाटन करत हिरवी झेंडी दाखवून वाहनाला मार्गस्थ करण्यात आले.



**सन फार्मा व साईधाम फाऊंडेशनचे संकल्प कॅन्सर स्क्रीनिंग प्रकल्पाला बळ**

याप्रसंगी जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. उल्हास गंडाळ, पाटोदाचे तालुका आरोग्य अधिकारी डॉ. नरेंद्र कासट, सन फार्माचे सोमनाथ दादास व साईधाम फाऊंडेशनचे मुख्य कार्यकारी अधिकारी स्वप्नील शिरसाठ, प्रकल्प समन्वयक वैभव दत्तनगिरे, स्वीय सहायक गिरीश मोहेकर यांची उपस्थिती होती. सन फार्मा लॅबोरेटरीज लिमिटेड यांच्या सीएसआर फंडातून आणि शिर्डीच्या साईधाम फाऊंडेशनच्या माध्यमातून हा महत्त्वाकांक्षी ◀◀ पान ३ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26